मराठी

# बालभारती

इयत्ता दुसरी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.


(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. १९.०३.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# मराठी
# बालभारती
## इयत्ता दुसरी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

IUJTQI

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठाच्या शेवटी देण्यात आलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
दुसरे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. शिवाजी तांबे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्रीमती स्वाती ताडफळे (सदस्य)
श्री. ज्योतिराम कदम (सदस्य)
श्रीमती संध्या विनय उपासनी
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. हरी नारलावार
श्री. अजित राक्षे
श्री. बाबासाहेब पवार
श्री. प्रमोद धायगुडे
श्रीमती रोहिणी चव्हाण
श्रीमती नीता खोत
श्रीमती पल्लवी गायकवाड
श्री. संजय खाडे
श्रीमती वैशाली काकडे
श्रीमती वनिता पोंक्षे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
श्रीमती ज्योती बेलवले
श्रीमती माधवी गमरे
श्री. संदीप वाकचौरे

**निर्मिती**

**सच्चिदानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी

**सचिन मेहता**
निर्मिती अधिकारी

**नितीन वाणी**
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

| | | |
|---|---|---|
| संयोजन | : | **श्रीमती सविता अनिल वायळ**<br>विशेषाधिकारी, मराठी<br>**श्रीमती संध्या विनय उपासनी**<br>सहायक विशेषाधिकारी, हिंदी |
| चित्रकार | : | रेश्मा बर्वे, श्री. राजेंद्र गिरधारी |
| मुखपृष्ठ | : | श्री. राजेंद्र गिरधारी |
| अक्षरजुळणी | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| कागद | : | ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह |
| मुद्रणादेश | : | N/PB/2021-22/75,000 |
| मुद्रक | : | M/S. ANAND PUBLICATIONS, JALGAON |

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो!

तुम्हां सर्वांचे इयत्ता दुसरीत स्वागत. दुसरीचे मराठी बालभारती हे पुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

इयत्ता पहिलीत तुम्ही छान बोलायला, चांगले वाचायला आणि लिहायला शिकलात. आता दुसरीत तुम्हांला आणखी पुढे जायचे आहे. पहिलीत जे बोलायला, वाचायला आणि लिहायला शिकलात ते अधिक पक्के करा. मग पुढे नव्या नव्या गोष्टी शिका. त्यासाठी या पाठ्यपुस्तकात तुम्हांला आवडतील अशी चित्रे आहेत, चित्ररूप गोष्टीही आहेत. चालीवर गाता येतील अशा कविता आहेत आणि छोटे छोटे चित्रमय आणि मनोरंजक पाठ आहेत.

पुस्तकातील चित्रे पाहा. चित्रांमधील वस्तू, झाडे, प्राणी, पक्षी आणि माणसे यांच्याशी बोला. चित्रांतील गोष्टी समजावून घ्या आणि वर्गातील मित्र-मैत्रिणींना सांगा. सगळ्यांनी मिळून गाणी म्हणा. पाठ वाचा. वाचता-वाचता समजून घ्या. पाठाखाली वेगवेगळ्या कृती दिल्या आहेत. त्या गमतीदार आहेत. पाठ वाचला, की पाठाखालील कृतींची उत्तरे मिळतील आणि पाठही अधिक चांगल्याप्रकारे समजेल. त्यामधून वाचन-लेखन शिकताना खूप मजा येईल.

पाठाखाली विनोद दिले आहेत. शब्दांची कोडी दिली आहेत. तसेच शब्दांचे खेळही दिले आहेत. अशा खेळांतून भाषा शिकताना तुम्हांला खूप आनंद वाटेल.

'हे असेच का?' आणि 'ते तसे का नाही?' असे प्रश्न तुम्हांला नेहमी पडतात, मग तुम्ही विचार करू लागता. या पाठ्यपुस्तकात तुम्हांला विचार करायला खूप संधी दिलेली आहे. विचार करत करत पुढे जा आणि मोठे व्हा.

तुम्ही मुले खूप कल्पक आहात. या पाठ्यपुस्तकात तुमच्या कल्पनाशक्तीला खूपच वाव दिलेला आहे. कल्पनेशी खेळून नवे नवे शोधताना तुम्हांला नक्कीच धमाल वाटेल.

मित्रमैत्रिणींनो, या पाठ्यपुस्तकातील सगळ्या कृती वर्गातच करायच्या आहेत. काय, मग आहे ना गंमत!

पाठाच्या शेवटी क्यू. आर. कोड दिलेला आहे. त्यामधून मिळालेली माहितीसुद्‌धा तुम्हांला आवडेल.

दुसरीत अधिक छान बोलायला, चांगले वाचायला आणि सुंदर लिहायला शिका. शिकून खूप खूप मोठे व्हा. तुम्हांला खूप साऱ्या शुभेच्छा!!!


**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.


पुणे
दिनांक : ०६ एप्रिल २०१९
भारतीय सौर : १६ चैत्र १९४१, गुढीपाडवा

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी दुसरी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) वैयक्तिक, गटात कार्य करण्याची संधी आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी –**<br>• आपल्या भाषेत बोलण्याचे, चर्चा करण्याचे भरपूर स्वातंत्र्य आणि संधी दिली जावी.<br>• मराठीमध्ये ऐकलेली गोष्ट, कविता, कथा इत्यादी आपल्या पद्धतीने आणि आपल्या भाषेत सांगण्याची/प्रश्न विचारण्याची तसेच त्यात आपल्या विचारांची भर घालण्याची संधी दिली जावी.<br>• मुलांद्वारे त्यांच्या भाषेत बोलल्या जाणाऱ्या गोष्टी मराठी भाषा आणि इतर भाषांमध्ये (जी भाषा वर्गात वापरली जाते किंवा ज्या भाषांमध्ये मुले वर्गात बोलतात.) पुन्हा मांडण्याची संधी द्यावी. त्यामुळे त्या भाषांना वर्गात योग्य स्थान मिळू शकेल आणि मुलांच्या शब्दसंपत्तीस, अभिव्यक्तीच्या विकासास संधी मिळू शकेल.<br>• वाचनकट्ट्याद्वारे मुलांना स्तरांनुसार वेगवेगळ्या भाषांतील (मुलांच्या स्वत:च्या भाषेतील/मराठी भाषेतील) मनोरंजक साहित्य जसे-बालसाहित्य, बालपत्रिका, फलक, दृकश्राव्य साहित्य उपलब्ध करून द्यावे.<br>• चित्रांच्या आधारे अनुमान लावून वेगवेगळ्या कथा, कविता अभ्यासण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.<br>• विविध उद्देशांना लक्षात घेऊन अध्ययनाच्या विविध आयामांना इयत्तांमध्ये योग्य स्थान देण्याची संधी असावी. जसे-एखाद्या गोष्टीमध्ये एखादी माहिती शोधणे, गोष्टीत घडलेल्या विविध घटनांचा योग्य क्रम लावणे, एखादी घटना घडण्यामागील तर्क सांगणे, पात्रांच्या संबंधित आपली आवड किंवा नावड सांगू शकणे इत्यादी.<br>• कथा, कविता वाचून सांगणे व त्यांवर चर्चा करणे यासाठी संधी दिली जावी.<br>• ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टी आपल्या पद्धतीने कागदावर उतरवण्याची संधी असावी. ही चित्रं, शब्द किंवा वाक्येही असू शकतात.<br>• मुलांनी आकृतीपासून अक्षरे तयार करताना/लेखन करताना अपेक्षित वळणदारपणा ठेवावा यासाठी वर्गात त्यांना प्रोत्साहन दिले जावे.<br>• मुलांनी स्वलिपीत केलेले लेखन हा भाषा अध्ययन प्रक्रियेचा भाग समजला जावा.<br>• संदर्भ आणि उद्देशांना अनुसरून उपयुक्त शब्द आणि वाक्य अभ्यासून, त्यांची रचना करण्याची संधी दिली जावी. | **अध्ययनार्थी –**<br>02.01.01 विविध उद्देशांसाठी स्वत:च्या भाषेचा किंवा/आणि शाळेतील माध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. उदा. माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्वत:चे अनुभव सांगणे, अंदाज व्यक्त करणे.<br>02.01.02 गप्पा, गोष्टी, कविता इत्यादी लक्षपूर्वक ऐकतात, स्वत:च्या भाषेत सांगतात.<br>02.01.03 पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी, कथा, कविता इत्यादींबद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात.<br>02.01.04 आपल्या आसपास घडणाऱ्या व ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टींचा (उदा. कथा, कविता, पोस्टर्स, जाहिरात) संबंध जोडून त्याबाबत गप्पागोष्टी करतात.<br>02.01.05 शब्दांच्या आणि ध्वनींच्या उच्चारांची मजा घेत लय आणि ताल असणारे शब्द तयार करतात. उदा. एक होता कावळा, जरासा बावळा.<br>02.01.06 स्वत:च्या कल्पनेने कथा, कविता इत्यादी ऐकवतात व त्यात भर घालतात.<br>02.01.07 आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार कथा, कविता, चित्र, पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी प्रतिक्रिया देतात, प्रश्न विचारतात.<br>02.01.08 चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.<br>02.01.09 चित्रातील वा चित्रमालिकांतील घडणाऱ्या घटना, कृती आणि पात्रांना एकसंधपणे गोष्टीरूपात समजून घेऊन त्याचा आनंद घेतात.<br>02.01.10 परिचित/अपरिचित मजकुरात रस घेतात आणि अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. उदा. चित्र किंवा मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, शब्द ओळखणे, पूर्वानुभव आणि माहितीचा वापर करून अर्थाचा अंदाज करणे.<br>02.01.11 लिखित/छापलेल्या मजकुरातील अक्षर, शब्द आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात. उदा. 'माझे नाव विमल आहे.' सांगा यात किती शब्द आहेत ते?/यातील 'विमल' शब्दात किती/कोणकोणती अक्षरे आहेत?<br>02.01.12 वर्णमालेतील अक्षरे व त्यांचे ध्वनी ओळखतात.<br>02.01.13 शाळेबाहेर आणि शाळेत (वाचनकोपरा/वाचनालय) आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.<br>02.01.14 स्वत: अथवा शिक्षकांनी ठरवलेल्या उपक्रमांतर्गत चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर-आकृती यांच्या पुढे जाऊन स्वयं पद्धतीने लेखन व स्व-नियंत्रित लेखन करतात.<br>02.01.15 ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वत:च्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे चित्रं/शब्द/वाक्यांद्वारे लिखित स्वरूपात अभिव्यक्त करतात.<br>02.01.16 आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभव आपल्या लेखनात समाविष्ट करतात.<br>02.01.17 एखादी कथा, कविता स्वत:च्या कल्पनेने पूर्ण करतात. |

# पाठ्यपुस्तकाचे स्वरूप आणि अध्ययन प्रक्रियेची दिशा

इयत्ता पहिलीत विद्यार्थ्यांच्या भाषा शिक्षणाची सुरुवात झाली आहे. श्रवण, भाषण कौशल्यांचा विकास होता होता त्यांना वाचन व लेखनाची गोडी लागली आहे. इयत्ता दुसरीच्या सुरुवातीच्या काळात सरावातून भाषिक कौशल्ये पक्की करत करत त्यामध्ये नवीन भर घालत पुढे जायचे आहे. विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या गोष्टींशी नवीन गोष्टी जोडत पुढे जावे, सोप्याकडून थोड्याशा कठिणाकडे जाताना छोटी छोटी आव्हाने समोर ठेवून शिकण्याचा प्रवास सुरू ठेवावा आणि शिकलेल्या भागाचे दृढीकरण होण्यासाठी वेळोवेळी सरावाची आवर्तने करावीत हे विचारात घेऊन या पाठ्यपुस्तकाची रचना केली आहे.

## पाठ्यपुस्तकाची रचना

**थोडे पक्के करूया, नवे काही शिकूया, थोडा विचार करूया** आणि **कल्पक होऊया** या चार संकल्पनांवर आधारित प्रथमच या पाठ्यपुस्तकाची रचना केली आहे. त्या त्या भागाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यामध्ये पाठ्यांश आणि कृतींचा समावेश केला आहे; परंतु प्रत्येक भाग अगदी कप्पेबंद नाही. प्रत्येक भागात मूलभूत भाषिक कौशल्यांचा समावेश आहे. चार भागात एकूण बारा पाठ, बारा कविता / गाणी, चार चित्रवाचन पाठ, सराव वाचनपाठ व काही कृती स्वरूपातील पाठ यांचा समावेश आहे. तसेच चित्रकथा, विनोद, शब्दकोडी, भाषिक खेळ, सरावासाठी उतारे व पाठावरील वर्गकार्य इत्यादींचा समावेश आहे. त्याशिवाय माझी आवड, फरक ओळखा अशा काही रंजक कृती पाठ्यपुस्तकात दिल्या आहेत. पाठ्यपुस्तकातील पाठाला अनुसरून आकर्षक व रंगीत चित्रांचा समावेश केला आहे. यांमधून अध्ययन निष्पत्ती, भाषिक कौशल्यांचा विकास होईल असा प्रयत्न केला आहे. अनुक्रमणिकेत फक्त चित्रवाचन, गद्य व पद्य पाठांचा समावेश केलेला आहे.

पाठ्यपुस्तकामध्ये गाभाघटक, जीवनकौशल्ये, मूल्ये यांचा वयोगटानुरूप समावेश आहे. जाहिरात वाचनाचा रंजक पद्धतीने समावेश केला आहे.

पाठ्यपुस्तकात नाम, सर्वनाम, लिंग, वचन, समानार्थी शब्द हे व्याकरणविषयक घटक आणि स्वल्पविराम, उद्गारवाचक चिन्ह, दुहेरी अवतरण चिन्ह ही विरामचिन्हे यांची कार्यात्मक स्वरूपात ओळख करून दिली आहे.

## माझी आवड

या पानात विद्यार्थ्यांच्या आवडीला विशेष प्राधान्य दिलेले आहे. आपल्या आवडीला शाळेत महत्त्व दिले जाते हे समजल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्याची गोडी लागेल. त्यासाठी वर्गात विद्यार्थ्यांच्या आवडी, निवडीसंबंधी चर्चा घडवून आणावी. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीला तेवढेच महत्त्व आहे हे लक्षात घ्यावे. नंतर काही काळाने पुन्हा तशीच चर्चा घडवून आणावी. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी योग्य ठिकाणी लिहाव्यात.

## चित्रवाचन

पाठ्यपुस्तकाच्या प्रत्येक भागाच्या आरंभी चित्रवाचनासाठी विद्यार्थ्यांना आवडणारी चित्रे दिली आहेत. पाठ्यपुस्तकात ***माझे खेळ, खेळण्यांचे दुकान, जंगल*** आणि ***दिवस-रात्र*** या चार चित्रांचा समावेश आहे. या चित्रांचे विषय विद्यार्थ्यांचे भावविश्व व्यापणारे आहेत. चित्रांसंबंधी चर्चा करताना विद्यार्थी चित्रात जे जसे दिसत आहे ते पाहतील व त्या विषयी बोलतील. पुढे त्याच चित्रांना विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी जोडून, पात्रांना नावे देऊन त्यांच्याशी संवाद करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. चित्रे पाहत पाहत विद्यार्थ्यांनी चित्रातील वस्तू, पशू, पक्षी, खेळणी, व्यक्ती, कृती आणि दृश्यांविषयी मनमोकळेपणे बोलावे अशी अपेक्षा आहे. **विद्यार्थ्यांच्या चर्चेला कोणतेही बंधन न घालता चर्चा अधिकाधिक पुढे कशी जाईल हे शिक्षकांनी पाहावे.**

## चित्रकथा

पाठ्यपुस्तकात **लोभी कुत्रा** ही चित्रकथा दिली आहे.त्यामध्ये पाच घटनाचित्रे दिली आहेत. शेवटच्या सहाव्या घटनेची जागा रिकामी ठेवली आहे. विद्यार्थ्यांनी चित्रकथेतील प्रत्येक चित्राचे निरीक्षण करावे, त्यांचा क्रम निश्चित करावा, त्यातील घटना स्वतःच्या शब्दांत सांगावी आणि शेवटी काय घडले असेल याबाबत प्रत्येक विद्यार्थ्याला सांगू द्यावे. गोष्ट विद्यार्थ्यांनीच सांगावी, विद्यार्थी अडल्यास गोष्ट पूर्ण करण्यासाठी शिक्षकांनी मदत करावी. वर्गात गोष्ट सांगण्याचा सराव द्यावा.

## भाग १ – थोडे पक्के करूया..

या भागात प्रामुख्याने पहिलीत झालेल्या वाचनाची, लेखनाची उजळणी दिलेली आहे. **आमचे घर** या पाठात पहिलीत झालेली मुळाक्षरे, स्वरचिन्हे यांची उजळणी व्हावी अशी योजना केली आहे. त्यानंतर विदुषकाचे चित्र पूर्ण करता करता वर्णमालेची उजळणी करावयाची आहे. **आमचे घर** व **भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण** या पाठांत शब्द आणि चित्रे यांच्या मदतीने वाचन, लेखन करताना विद्यार्थ्यांना गंमत वाटेल. **चंपकला शाबासकी मिळाली** आणि **वडेश बहरला** हे जोडाक्षर विरहित पाठ आहेत. त्यामुळे मुळाक्षरे आणि स्वरचिन्हे यांच्या उजळणीबरोबर सहजपणे वाचनाचा आनंद मिळेल. सहभागी वाचनासाठी **चतुर हिराबाई** या पाठाचा समावेश केला असून शिक्षकांनी तो वाचून आणि चित्रे दाखवून त्यावर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे. तसेच वर्गातील चर्चेनंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांसोबत पाठ वाचावा.

या भागातील वर्गकार्यामध्ये पहिलीतील जोडाक्षरयुक्त शब्दांच्या उजळणीचा समावेश केला आहे. तसेच च.छ,ज, झ , श, ष , स आणि ळ यांच्या उच्चारण सरावासाठी काही कृती दिलेल्या आहेत.

### भाग २– नवे काही शिकूया

या भागात विद्यार्थ्यांनी पाठाच्या माध्यमातून व वर्गकार्यातून नवीन जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन, लेखन शिकावे. नंतर **र च्या जोडाक्षरांची गंमत** अनुभवल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जोडाक्षरयुक्त शब्दांच्या वाचन व लेखनातील अडचणी दूर होतील. या भागात स्वल्पविराम, दुहेरी अवतरण चिन्ह, नाम, सर्वनाम यांसारखे व्याकरणाचे घटक कार्यात्मक स्वरूपात अभ्यासावेत अशी योजना केली आहे. तसेच येथे इकारयुक्त, उकारयुक्त शब्दांच्या लेखनाचा सराव मिळणार आहे. घटनाक्रम लावणे, चांगल्या सवयी अंगी बाणवणे इत्यादी गोष्टी विद्यार्थी नव्याने शिकणार आहेत.

या भागात **झरीपाडा** हा आदिवासी जीवनावर आधारित पाठ आहे. मात्र या पाठाच्या निमित्ताने शिक्षकांनी स्थानिक संदर्भाच्या अनुषंगाने अध्ययन अनुभवांची रचना करावी. स्थानिक परिसर, वनस्पती सृष्टी, प्राणिजीवन, खाद्यसंस्कृती, लोकजीवन, लोकपंरपरा, लोककला यांच्याशी नाते सांगणारे वयोगटानुरूप अध्ययन अनुभव देणे अपेक्षित आहे. **पाऊसफुले** हा रंजकपाठ नाट्यीकरणातून अधिक रंजक व आनंददायी करता येईल. त्याबरोबर त्यामधून काही नवीन गोष्टी सहजतेने शिकता येतील.

### भाग ३– थोडा विचार करूया

भाषिक कौशल्यांच्या विकासाबरोबर विचार प्रक्रियेचा विकास करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या भागातील दिनदर्शिकेच्या माध्यमातून ज्ञान शाळेबाहेरील जगाशी कसे जोडावे हा विचार कळत नकळत रुजू लागेल, तर **हिवाळा** या कवितेतून निसर्गाच्या किमयेचा विचार मनात रुंजी घालू लागेल. **संगणकाची करामत** या पाठातून संगणक किती व कोणती कामे करतो या संबंधीचे कुतूहल जागृत होऊन विचार प्रक्रियेला चालना मिळेल. हा पाठ नाट्यीकरण पद्‌धतीने घेतल्यास नवीन विषय सहजपणे आत्मसात होण्यास मदत होईल. **आपला भारत** या पाठातून विविधतेतील एकतेचा विचार समजण्यास मदत होईल. या भागात का, कसे अशा स्वरूपाचे विचारप्रवर्तक प्रश्नही दिलेले आहेत.

### भाग ४ – कल्पक होऊया

कल्पकता हा नवनिर्मितीचा, सर्जनशीलतेचा पाया आहे. विद्यार्थी कल्पक असतात. त्यांच्या कल्पकतेला पुरेसा वाव देऊन त्यांना नवनिर्मितीकडे वळवायला हवे. त्या दृष्टीने या भागाची रचना केलेली आहे. या भागात **मंगळावरची शाळा, चांदोबाच्या देशात** आणि **फुग्या रे** या कल्पनाविश्वात रमवणाऱ्या कविता समाविष्ट केल्या आहेत. त्यामधील कल्पक गमतीजमती विद्यार्थ्यांना निश्चित आवडतील. शाळेत मुलांचे स्नेहसंमेलन असते, त्यामुळे **फुलांचे संमेलन** या पाठातील कल्पना विद्यार्थ्यांना नक्कीच आवडेल. **मांजराची दहीहंडी** आणि **मोरपिसारा** हेही असेच कल्पनारम्य पाठ आहेत. या भागातील भन्नाट कल्पनांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी करता येईल. याच भागात शेवटी **काय बरे म्हणत असतील?** या चित्रमय कृती स्वरूपातील पाठात विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव दिला आहे. या भागातील काही कृती / प्रश्न विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आवाहन करणारे आहेत.

**वर्गकार्य –** पाठाखाली वर्गकार्यांतर्गत विविध स्वरूपाच्या कृती /प्रश्न दिलेले आहेत. त्यामध्ये निरीक्षण करणे, ऐकणे, म्हणणे, कविता चालीवर म्हणणे, मोठ्याने वाचणे, पाठीमागून वाचणे, मनात वाचणे, चित्राविषयी माहिती सांगणे, गोष्ट पूर्ण करणे, शब्दडोंगर तयार करणे, तक्ता पूर्ण करणे, घटनाक्रम लावणे, कोण/काय/कोठे/कसे/कधी यांवर आधारित प्रश्न; कारण सांगणे, ओळखा पाहू, शब्दसाखळी पूर्ण करणे, चित्रशब्दकोडे व शब्दकोडे सोडविणे, तर काय होईल हे सांगणे, काय झाले असते ते सांगणे, शब्दांशी खेळूया, जोड्या जुळविणे, अपूर्ण वाक्य पूर्ण करणे, चित्र काढणे इत्यादी कृती/प्रश्नांचा समावेश आहे. या कृती/प्रश्नांमधून भाषिक कौशल्यांच्या विकासाबरोबर ज्ञान, आकलन, उपयोजन, कार्यकारणभाव, कारणमीमांसा, वर्गीकरण, तुलना यांसारखी उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी पायाभरणी होईल.

**सराव–** पाठ्यपुस्तकात इयत्ता पहिलीतील वाचन, लेखन यांच्या सरावाचा श्रेणीबद्‌ध समावेश करण्यात आला आहे. तसेच नव्याने शिकलेल्या जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन, लेखन या कौशल्यांच्या सरावाचा जाणीवपूर्वक समावेश केलेला आहे. वाचन–लेखनासाठी काही लहान सराव पाठ, उतारे दिलेले आहेत. वैयक्तिक स्वरूपात, गटात अथवा वर्गात वेळोवेळी सरावाची आवर्तने केल्यामुळे मुलांच्या वाचन–लेखनाची चांगली तयारी होण्यास मदत होईल.


**विषयांशी समवाय–** पाठ्यपुस्तकात प्रामुख्याने परिसर अभ्यास, कला, गणित, शारीरिक शिक्षण व आरोग्य या विषयांशी शक्य तेथे सहजतेने समवाय साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**अध्ययन–अध्यापन प्रक्रिया –** ज्ञानरचनावादाच्या तत्त्वाला अनुसरून अध्ययन अनुभव देता येतील अशा पद्‌धतीने पाठांची आणि कृतींची योजना केलेली आहे. अध्ययन अनुभव देताना ते स्थानिक संदर्भांशी जोडून द्यावेत. तसेच पाठ्यपुस्तकातील अध्ययन अनुभवांच्या अनुषंगाने स्थानिक संदर्भाला योग्य ठरतील असे अध्ययन अनुभव स्वतंत्रपणे द्यावेत.

**'थोडे पक्के करूया'** या भागातील पाठ इयत्ता पहिलीत झालेल्या वर्णमालेच्या उजळणीवर आधारित असल्यामुळे विद्यार्थी स्वतंत्रपणे वाचन करू शकतील. पुढील तीन भागांतील पाठांशी संबंधित अध्ययन अनुभव देताना चर्चा, संवाद, गप्पागोष्टी, गटकार्य, सहाध्यायी मूल्यमापन यांसारख्या पद्‌धतींचा अवलंब करता येईल. सरावाची, अध्ययन अनुभवांची रचना आणि स्वाध्यायांची योजना नेहमीच विद्यार्थीकेंद्री राहावी. विद्यार्थ्यांची मते, अनुभव यांना महत्त्व द्यावे. त्यासाठी पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश, चित्रे, स्थानिक उपलब्ध शैक्षणिक साहित्य यांचा उपयोग करावा. परिसरातील वस्तू, घटना, प्रसंग, स्थळे यांच्या माध्यमातून अधिक चैतन्यदायी अध्ययन अनुभव मिळतील अशी योजना करावी.

ज्ञानरचनावादाची तत्त्वे विचारात घेऊन विद्यार्थीस्नेही वातावरणात पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहूया.

# माझी आवड




नाव ..................................

शाळा ..................................

इयत्ता ..................................

तुकडी ..................................



# अनुक्रमणिका

## भाग – १



### थोडे पक्के करूया


| पाठ, लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. चित्रवाचन | ४ |
| २. देवा तुझे किती (गाणे)<br>– ग. ह. पाटील | ७ |
| ३. डिंगोरी (कविता)<br>– मंदा खांडगे | १० |
| ४. चतुर हिराबाई | १२ |
| ५. फुलपाखरू (कविता)<br>– दादासाहेब कोते | १४ |
| ६. चंपकला शाबासकी मिळाली | १५ |
| ७. वडेश बहरला | १६ |


## भाग – ३



### थोडा विचार करूया


| पाठ, लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १५. चित्रवाचन | ४० |
| १६. चुलीवरची खीर (कविता)<br>– निर्मला देशपांडे | ४२ |
| १७. दिनदर्शिका | ४४ |
| १८. हिवाळा (कविता)<br>– अनंत कांबळे | ४६ |
| १९. संगणकाची करामत | ४८ |
| २०. कणभर तीळ (कविता)<br>– लीलावती भागवत | ५४ |
| २१. आपला भारत | ५८ |


## भाग – २



### नवे काही शिकूया


| पाठ, लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|
| ८. चित्रवाचन | २२ |
| ९. हळूच या हो हळूच या! (कविता)<br>– कुसुमाग्रज | २४ |
| १०. चिंटू रुसला...चिंटू हसला | २६ |
| ११. भेळ (कविता)<br>– मंदाकिनी गोडसे | २८ |
| १२. पाऊसफुले<br>– राजीव तांबे | ३० |
| १३. एक तांबडा भोपळा (कविता)<br>– पद्मिनी बिनीवाले | ३२ |
| १४. झरीपाडा | ३५ |


## भाग – ४




### कल्पक होऊया


| पाठ, लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|
| २२. चित्रवाचन | ६० |
| २३. मंगळावरची शाळा (कविता)<br>– फादर फिलीप कार्व्हालो | ६२ |
| २४. फुलांचे संमेलन<br>– बाळकृष्ण मुरलीधर बाचल | ६४ |
| २५. फुग्या रे (कविता)<br>– वसुधा पाटील | ६६ |
| २६. मांजरांची दहीहंडी<br>– सुशीला कशेळकर | ६९ |
| २७. चांदोबाच्या देशात (कविता)<br>– एकनाथ आव्हाड | ७२ |
| २८. मोरपिसारा<br>– ईशान पुणेकर | ७४ |

# फरक ओळखूया

- खालील दोन चित्रांमधील आठ फरक सांग आणि दाखव.



भाग – १

# थोडे पक्के करूया

## १. चित्रवाचन

- चित्रे बघ, चित्रांत काय काय दिसते ते सांग.




# माझे खेळ


- तू कोणकोणते खेळ खेळतोस/खेळतेस, त्याविषयी सांग.





# लोभी कुत्रा


- चित्रे बघ, गोष्टीच्या शेवटी काय घडले असेल त्याचा विचार कर आणि गोष्ट पूर्ण करून सांग.











शेवटी काय घडले असेल ते सांग.

# २. देवा तुझे किती

- ऐकूया. गाऊया.



देवा तुझे किती । सुंदर आकाश
सुंदर प्रकाश । सूर्य देतो



सुंदर चांदण्या । चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर । पडे त्याचे



सुंदर ही झाडे । सुंदर पाखरे
किती गोड बरे । गाणे गाती



सुंदर वेलींची । सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले । देवा, तुझी

– ग. ह. पाटील

VR6NFE

# आमचे घर

- चित्राऐवजी शब्द वापरून वाक्य तयार कर, लिही आणि वाच.

(१) हे आमचे  . घरात आई, बाबा, दादा, आजी-आजोबा व मी राहते.


(२) आई घरी  वर काम करते.


(३) मी  चालवते. आजोबांसाठी  आणते.

(४) हे  चे फूल आहे. बाबा सणाच्या दिवशी झेंडूचे  दारावर लावतात.

(५) दादा  समोर रांगोळी काढतो. मी मदत करते.

(६) ही माझी  आहे. बॅगेत वही, पेन आहे.

(७) दादाने  मांडली. दोघे इथे  बसलो.

(८) दादाने पाहिले, आकाशात  आले. टेकडीवर  थुई थुई नाचू लागला.

.....................................................................

(९)  पासून साखर तयार होते. ज्ञानेशमामाला साखरेसारखा गोड  आवडतो.

.....................................................................

(१०) आई भाकरी करते. शेजारची छाया  निवडायला मदत करते.

.....................................................................

(११) शेजारची समीक्षा मातीची  तयार करते. अनिता कागदाची  तयार करते.

.....................................................................

(१२) सायंकाळी आकाशात  उडतात. मी आणि दादा पाहत राहतो.

.....................................................................

- वरील चित्रांसाठी असलेले शब्द सांग.

- ऐक, म्हण.

## शेवटच्या अक्षराची गंमत

हाताचे शेवटचे बोट – **करंगळी**


पुरण घालून करतात ती – **पुरणपोळी**

फुलाचा भाग – **पाकळी**

न उमललेले फूल – **कळी**

एका हाताने वाजत नाही ती – **टाळी**

लाकडे एकत्र बांधून केलेली – **मोळी**



# ३. डिंगोरी

• ऐकूया. गाऊया.



डिंगडिंग डिंगोरी
भिंगभिंग भिंगोरी
गरगर फिरली
चक्कर येऊन पडली



ट्रिंगट्रिंग सायकल
धावधाव धावली
घरभर भटकून
धपकन धडकली



किल्लीचा ससोबा
तुरुतुरु धावला
गवत खायला
बागेत पळाला



निळ्या-निळ्या डोळ्यांची
चिमुकली बाहुली
पऱ्यांच्या राज्यात
भटकायला गेली



बाळाची खेळणी
खेळ – खेळ खेळली
दमून भागून
कपाटात झोपली

–मंदा खांडगे

## वर्गकार्य

• कविता चालीवर म्हण.

8MSI5A

# चित्र पूर्ण करूया

- अक्षरे क्रमाने लिही. त्याप्रमाणे ठिपके जोड. चित्र पूर्ण कर. चित्र रंगव.



# ४. चतुर हिराबाई

पहाट झाली. माणिक झोपेतून उठला. बाहेर पाहिले. दोन बैलांपैकी एकच बैल दिसला. माणिकने बायकोला हाक मारली. दोघांनी सगळीकडे बैलाचा शोध घेतला; पण बैल सापडला नाही. दुसरा बैल चोरीला गेला होता.



माणिक व माणिकची बायको हिराबाई बैल-बाजारात गेले. अचानक हिराबाई ओरडली, ''अहो! हा पाहा आपला बैल. चोर सापडला.'' आवाज ऐकून चोर घाबरला. तसे न दाखवता तो बोलला, ''हा बैल माझाच आहे.'' दोघे भांडू लागली.



हिराबाई चतुर होती. तिने बैलाचे डोळे हाताने बंद केले. चोराला विचारले, ''बैलाचा कोणता डोळा अधू आहे ते सांग. बरोबर सांगितले तर बैल तुझा.'' चोराने अगोदर उजवा मग डावा असे सांगितले.



हिराबाईने हात बाजूला केला. बैलाचा कोणताही डोळा अधू नाही असे दिसले. लोकांनी चोराला पकडले. पोलीस आले. चोराला घेऊन गेले. माणिक आणि हिराबाई बैल घेऊन आनंदाने घरी गेले.



## वर्गकार्य

- प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांग.
- ही गोष्ट तुझ्या शब्दांत सांग.
- तुला माहीत असलेली गोष्ट मित्राला सांग.

## वाचूया, लिहूया

- ऐक, म्हण, लिही, वाच.

| | | | |
|---|---|---|---|
| च– चमचा ......... | चार ......... | चाक ......... | चाळीस ......... |
| छ– छकुला......... | छान ......... | छमछम ......... | छाया ......... |
| ज– जहाज......... | जेवण ......... | जोडी ......... | जनता ......... |
| झ– झबला......... | झाड ......... | झाकण ......... | झुरळ ......... |
| श– शेळी......... | शतक......... | मशाल ......... | माशी ......... |
| ष– षटक......... | षटकार......... | षटकोन ......... | विशेष ......... |
| स– ससा......... | कासव......... | दिवस ......... | खसखस ......... |

- मोठ्याने वाच आणि पाटीवर लिही.

औसा गावी आमचा दौलतवाडा आहे. मधोमध चौक आहे. तिथे हौद आहे. हौदात कारंजे आहे. चौफेर फुलझाडे आहेत. बाहेर बैलांचा गोठा आहे. आजोबा बैलांना वैरण टाकतात. बैल औत ओढतात.

KJECU6

# ५. फुलपाखरू

• ऐकूया. गाऊया.



फुलांच्या दुनियेत
फुलपाखरू दंग
हळूच टिपते
फुलांचे रंग...

फुलावर बसते
खुदकन हसते
फुलांचे रंग
पंखांना फासते...

निळसर-जांभळे
ठिपके छान
सोनेरी रंगाची
सुंदर कमान...

फुलांच्या दुनियेत
फुलपाखरू दंग
पंखांना त्याच्या
फुलांचे रंग...

– दादासाहेब कोते

## वर्गकार्य

• कसे ते लिही.

(अ) फुलपाखरू रंग टिपते. -............ (आ) फुलपाखरू हसते. -.............

• कोठे ते लिही.

(अ) फुलपाखरू दंग होते. -............ (आ) फुलपाखरू बसते. -.............

• प्रत्येक रंगाच्या वस्तूचे नाव लिही.

- निळा............ हिरवा............
- पिवळा............ लाल ............
- पांढरा ............ काळा ............

XG17J2

# ६. चंपकला शाबासकी मिळाली




चंपक डोंगरगावी राहायचा. गाव सुंदर होते. चंपकला गाव आवडायचे. चंपकचे सुरेशमामा शहरात राहायचे. तो मामांकडे शहरात शिकायला गेला. चंपक शिकून मोठा झाला. चंपकला काम करायला आवडायचे. चंपकने नगरपालिकेची परवानगी मिळवली. मामांनी मदत केली. चंपकने हिराबागेजवळ केळीची गाडी उभी केली. पिवळीधमक, गोड केळी लोकांना आवडू लागली. एके दिवशी एका मुलाने केळी घेतली. त्यातील एक केळे खाऊन साल सडकेवर टाकली. मागून आलेले आजोबा सालीवरून घसरले, पडता पडता सावरले. चंपक धावत मदतीला गेला. आजोबांना बाजूला नेऊन बसवले, पाणी दिले. चूक मुलाने केली; पण चूक आपलीच समजून चंपकने आजोबांची माफी मागितली. आजोबांनी शाबासकी दिली. चंपकने गाडीजवळ कचराकुंडी ठेवली. केळी खाऊन लोक साली कचराकुंडीत टाकू लागले. नगरपालिकेची कचरागाडी कचरा नेऊ लागली. सडक साफ राहू लागली. चंपकला आनंद झाला.

**वर्गकार्य**

- पाठ मोठ्याने वाच.

**उपक्रम :**

गावची साफसफाई कोण करते त्याची माहिती मिळव व सांग.

**वाचूया, लिहूया**

- शब्द वाच आणि लिही.

| | | |
|---|---|---|
| आत्या ............. | पणत्या ............. | मिरच्या ............. |
| मस्तक ............. | हस्ताक्षर ............. | जास्त ............. |
| सल्ला ............. | गल्ला ............. | चिल्लर ............. |
| मॅच ............. | बॉल ............. | डॉक्टर ............. |

ACM28X



## ७. वडेश बहरला

चिंचपूर नावाचे गाव होते. गावाजवळ ओढा होता. तिथे एक झाड होते. झाडाचे नाव होते वडेश. वडेश उंच उंच वाढला होता. जणू काही आभाळाला भिडला होता. आजूबाजूला खूप खूप पसरला होता.फांदीफांदीवर पानेच पाने होती. पाने हिरवीगार होती. झाडाखाली थंडगार सावलीत बसायला फारच मजा यायची. झाडावर चिमणी, कावळा, खारुताई, मैना, राघू यायचे. किलबिल करत बोलायचे, गोड गाणी गायचे. वडेशला पाखरांची भाषा समजायची. तो पानांची सळसळ करून बोलायचा आणि फडफड करून रागवायचा.

पाखरांना पिले होती. चिमणीचे पिलू होते चिनू. कावळीणीचे पिलू होते कानू. पोपटाचे पिलू होते पिनू. पिले लपाछपी खेळत. पारंबी पकडून झोके घेत. खूप दंगा करत. दुपारी वडेशची झोप मोडायची. तो वैतागून जायचा. पिलांवर रागवायचा. पिलांना सांगायचा.

उडा उंच भूर भूर<br>
जा खूप दूर दूर<br>
करता खूप कटकट<br>
निघा इथून झटपट



पिलांना वडेशचा राग यायचा. ती वडेशचे नाव आईबाबांना सांगायची. नेहमी नेहमी पिलांचे बोलणे ऐकून पाखरांना वडेशचा राग आला. अचानक पाखरे दूर निघून गेली.

इथे कोणी बोलायला नाही. कोणी खेळायला नाही. आता काय करावे? वडेशला एकटे एकटे वाटू लागले.

हिवाळा संपला. ऊन तापू लागले. फांदीवर तांबूस कोवळे अंकुर दिसू लागले, ते हळूहळू मोठे झाले. मग पोपटी होत गेले. कोवळी पाने दिसू लागली. पाने हिरवीगार झाली. फांदीफांदीवर हिरवे हिरवे ठिपके दिसू लागले. ते हळूहळू लालसर झाले. मग फळे लालचुटुक झाली. जाता येता पाखरांना फळे दिसू लागली. ती शीळ घालून वडेशला हाका मारू लागली. वडेशला पाखरांची ओढ होतीच. रुसवा संपला होता.

तो पाखरांना बोलावू लागला.

यारे या, सारे या
चटकन या, पटकन या
लाल लाल फळे खाऊन जा

पाखरे बोलू लागली,

येतो येतो, पटकन येतो
हासत नाचत चटकन येतो
गाणी गात गात येतो.
लाल लाल फळे खातो..

पाखरे वडेशजवळ आली. नवी घरटी बांधली. वडेशजवळ राहू लागली. वडेशला खूप आनंद झाला. मोठी झालेली पिले पाहून वडेश बहरून आला.

## वर्गकार्य

- **पाठाचे वाचन ऐक, पाठीमागून वाच.**
- **कोण ते लिही.**
  (अ) लपाछपी खेळणारी ............................................
  (आ) पाखरांची भाषा समजणारा ......................................
- **का ते सांग.**
  (अ) वडेश वैतागून जायचा, कारण...
  (आ) पाखरे दूर निघून गेली, कारण ...
  (इ) पाखरे वडेशजवळ परत आली, कारण ...
- **'भूर भूर' यासारखे पाठातील शब्द शोधून लिही.**

  ..............................................................................................
- **वाच व क्रमाने सांग.**
  (अ) पाखरांची पिले दंगा करायची.
  (आ) पाखरे दूर निघून गेली.
  (इ) पाखरांना वडेशचा राग आला.
  (ई) वडेश पिलांवर रागवायचा.
- **पाठातील प्रश्नचिन्ह (?) असलेले वाक्य शोधून लिही.**

  ..............................................................................................

- कविता पूर्ण कर.

कावळा करतो, ........................

चिमणी करते, ........................


कोंबडा बोलतो, ........................

कोकीळ बोले, ........................

M98VXT

## खेळूया शब्दांशी

* दिलेल्या अक्षरांपासून सुरू होणारे शब्द लिही.







# भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण



- चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून पाठ वाच.

एक होती  . एके दिवशी  घेऊन ती गेली बाजारात. बाजारातून तिने  आणल्या आणि स्वयंपाकघरात एका  भरून ठेवल्या. आजी बाहेर जाताच टोपलीतून बाहेर पडले एक . ते म्हणाले, ''मी आहे तुमचा राजा, तुम्ही माझे ऐकायचे.'' तोच  म्हणाला, ''मी मोठा आहे म्हणून मीच आहे राजा.''  चिडून म्हणाले, ''नाहीच मुळी. मी आहे लालेलाल, मीच आहे राजा!''  म्हणाला, ''माझे ऐका, सर्व भाज्या चवदार करणारा मीच आहे राजा.''  आणि  भांडण सोडवण्यासाठी धडपड करू लागली; पण कोणीच ऐकेना. तेवढ्यात  परत आली. तिच्या हातात  होती. तिने  कापला, टोमॅटो चिरले.  निवडली, धुतली.  उकडले आणि बनवली झकास भाजी!  कापून भाजी केली.  भाजून भरीत केले.  चिरून कोशिंबीर केली. भाज्यांनाही गंमत वाटली. सगळ्यांची एकमेकांशी गट्टी झाली.  वाटून चटणी केली.  किसून हलवा केला. नातवासाठी  वाढले. जेवण मग थाटात झाले.

– रेश्मा बर्वे

# मी आहे असा

- वाच. खालील तक्त्यात माहिती लिही.

मी जावेद.
मी गावात राहतो.
मी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकतो.
आई, बाबा शेतकरी आहेत.
मला पोहायला आवडते.
माझी भाषा उर्दू आहे.



मी पीटर.
मी छोट्या शहरात राहतो.
मी नगरपालिकेच्या शाळेत शिकतो.
माझे बाबा बँकेत नोकरी करतात.
आई शिक्षिका आहे.
मला चित्र रंगवायला आवडते.
माझी भाषा कोंकणी आहे.



मी रूपाली.
मी महानगरात राहते.
मी महानगरपालिकेच्या शाळेत जाते.
आई शिलाईकाम करते.
बाबा वाहनचालक आहेत.
मला क्रिकेट आवडते.
माझी भाषा मराठी आहे.



| नाव | राहण्याचे ठिकाण | भाषा | आवड | व्यवसाय | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | आई | बाबा |
| जावेद | .................. | ........... | .............. | ........... | ........... |
| पीटर | .................. | ........... | .............. | ........... | ........... |
| रूपाली | .................. | ........... | .............. | ........... | ........... |
| तुझी माहिती | .................. | ........... | .............. | ........... | ........... |

## नवे काही शिकूया

# ८. चित्रवाचन

- चित्रांत काय काय दिसते ते सांग.




# खेळण्यांचे दुकान

- चित्रांतील कोणकोणती खेळणी तुला आवडतात ते सांग.



# ९. हळूच या हो हळूच या!

- ऐकूया. गाऊया.



हळूच या हो, हळूच या!
गोड सकाळी ऊन पडे
दवबिंदूंचे पडति सडे
हिरव्या पानांतुन वरती
येवोनी फुललो जगती
हृदये अमुची इवलीशी
परि गंधाच्या मधि राशी
हासुन डोलुन
देतो उधळुन
सुगंध या तो सेवाया;
हळूच या; पण हळूच या!

कधि पानांच्या आड दडू
कधि आणू लटकेच रडू
कधि वाऱ्याच्या झोताने
डोलत बसतो गमतीने
तऱ्हेतऱ्हेचे रंग किती
अमुच्या या अंगावरती
निर्मल सुंदर
अमुचे अंतर
या आम्हांला भेटाया;
हळूच या; पण हळूच या!

– कुसुमाग्रज

## वर्गकार्य

- **कविता चालीवर म्हण.**
- **काय ते लिही.**

(अ) दवबिंदूचे पडतात – ..........................

(आ) फुले आनंदाने उधळतात – ..........................

- **कसे ते लिही.**

फुलांकडे जावे – ..........................

फुलांचे हृदय – ..........................

- **कोठे ते लिही.**

(अ) फुले लपून बसतात ते ठिकाण – ..........................

(आ) तऱ्हेतऱ्हेचे रंग – ..........................

- **तर काय झाले असते ?**

वारा सुटला नसता तर ..........................

- **एका वाक्यात उत्तरे सांग.**

(अ) इतरांना देण्यासारखी कोणती गोष्ट तुझ्याजवळ आहे ?

(आ) फुलांप्रमाणे आणखी कोणाचा सुगंध सगळीकडे पसरतो ?

(इ) फुलांप्रमाणे आणखी कोणाचे मन निर्मल, सुंदर असते ?

(ई) तुला कोणत्या फुलांचा रंग व वास आवडतो ?

- **का ते सांग.**

(अ) फुले त्यांच्याजवळ बोलावतात, कारण ...

(आ) 'आम्हांला भेटायला हळूच या' असे फुले म्हणाली, कारण ...

(इ) फुले गमतीने डोलतात, कारण ...

- **शोध आणि लिही.**

शेवटच्या अक्षरांचा उच्चार सारखा असणाऱ्या कवितेतील शब्दांच्या जोड्या शोधून पाटीवर लिही. जसे– वरती–जगती

- **पुढील शब्दांचे कवितेतील समानार्थी शब्द शोधून लिही.**

लहान .............. खोटे खोटे ..............

सुवास .............. मन ..............

FVELJJ

# १०. चिंटू रुसला...चिंटू हसला



चिंटू रोज सकाळी उशिरा उठायचा. आईबाबा त्याला लवकर उठवायचे. पण छे! चिंटू काही उठायचा नाही. शाळेची घंटा वाजली, की घाईघाईने अंघोळ उरकून, गणवेश घालून धावतपळत शाळेत जायचा. विस्कटलेले केस, चिपडलेले डोळे, चुरगळलेले कपडे पाहून मुले हसायची, चिडवायची. त्याला अभ्यास करताना आनंद वाटायचा नाही. अनेकदा मुले चिंटूसोबत खेळतही नसत. त्याला आपलाच राग यायचा. तो नाराज राहायचा. तो स्वत:वरच रुसायचा. काय करावे याचा एकटाच विचार करत बसायचा.



एक दिवस चिंटूला एकटाच बसलेला पाहून, त्याची ऋतुजाताई जवळ आली. चिंटूला म्हणाली, "चिंटू काय झाले रे?'' चिंटू म्हणाला, "बघ ना, माझ्याशी कोणी बोलत नाही, खेळत नाही. मला खूप वाईट वाटते." "अरे, एवढेच ना! हे बघ चिंटू, मी तुला काय करायचे ते सांगते, करशील ना तू? ऐकशील ना माझे?" ऋतुजा म्हणाली. चिंटू म्हणाला, ''हो ऐकेन ना मी सगळे, सांग ना.'' ऋतुजा म्हणाली, "हे बघ, रोज सकाळी लवकर उठायचे. शौचास जाऊन यायचे. हात-पाय स्वच्छ धुवायचे. दात घासायचे. अंघोळ करायची. स्वच्छ कपडे घालायचे. केस विंचरायचे. दप्तर नीट भरायचे. दररोज अभ्यास करायचा. असे दररोज केले, की सगळेच तुझे मित्र होतील." चिंटूला हे पटले.



दुसरा दिवस उजाडला. कोणीही न सागंताच चिंटू सकाळी लवकर उठला. ऋतुजाताईने सांगितलेले सगळे केले. अभ्यासाला बसला. आईबाबांना आनंद झाला. शाळेत जाताना चिंटूने आरशात पाहिले, चिंटू सुंदर दिसत होता. तो फारच खुशीत होता. चिंटू नाचतच शाळेत गेला. चिंटूभोवती मुले गोळा झाली. स्वच्छ आणि आनंदी दिसणारा चिंटू सगळ्यांचाच मित्र झाला. शिक्षकांनी चिंटूचे कौतुक केले. चिंटू आनंदाने हसू लागला.



## वर्गकार्य

- **पाठ मोठ्याने वाच.**
- **कारण सांग.**

(अ) चिंटूला मित्र नव्हते, कारण .....

(आ) चिंटूला अभ्यास करताना आनंद वाटायचा नाही, कारण .....

(इ) ऋतुजाताई जवळ आली, कारण .....

(ई) चिंटू हसू लागला, कारण .....

- **काय होईल ते सांग.**

(अ) तुला मित्र नसतील, तर .....

(आ) स्वच्छ राहिले नाही, तर .....

(इ) उशीरा झोपलो, उशीरा उठलो, तर .....

- **कशासाठी काय काय वापरतात ते लिही.**

(अ) दात घासण्यासाठी ..........................................................................

(आ) अंग पुसण्यासाठी ..........................................................................

(इ) कपडे धुण्यासाठी ..........................................................................

(ई) अंगण झाडण्यासाठी ..........................................................................

(उ) केस धुण्यासाठी ..........................................................................

- **तू सकाळी उठल्यापासून शाळेत जाईपर्यंत काय काय करतोस/करतेस ते क्रमाने लिही.**
- **तुला मित्र मिळावेत म्हणून कोणकोणत्या चांगल्या सवयी असाव्यात ते सांग.**
- **ऐक, म्हण, लिही.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ऋ | ऋतू | ऋण | ऋषी | ऋषभ | ऋतुजा |

- **वाच. शिक्षकांकडून समजून घे.**



व्यवस्थितपणा म्हणजेच सुंदरता. कोणतेही काम वेळच्या वेळेस करणे, कोणतीही वस्तू नीट जागेवर ठेवणे, पैशांचा व्यवस्थित हिशेब ठेवणे, दिलेल्या शब्दाप्रमाणे वागणे, रांगेत नीट उभे राहून तिकिटे घेणे, रांगेमध्ये उभे राहून बसमध्ये शिरणे... शेकडो गोष्टी व्यवस्थितपणात येतात.

**साने गुरुजी**

**व्यवस्थित राहण्यासाठी तू आणखी काय करशील?**

SS1G9F

# ११. भेळ

- ऐकूया. गाऊया.

“आई... आई , करना गं भेळ”
“छे रे बाबा, मला नाही वेळ”

एवढे कसले नाराज होता
भेळ करू बघता बघता!

चुरमुरे घ्या कुरकुरीत
शेव पापडी चुरचुरीत!

टोमॅटो, कांदा, कोथिंबीर
अगदी बारीक छान चीर!

पाणी... खजूर, थोडी चिंच
कालवून चटणी केली मस्त!

थोडं तिखट..थोडं मीठ
मिसळून टाका छान नीट!

गोल बसा.. गालात हसा
वाटून घ्या ..पसा..पसा!

बघता बघता चट्टामट्टा
कागद नक्की डब्यात टाका!

– मंदाकिनी गोडसे




वर्गकार्य

- भेळ तयार करण्यासाठी लागणारे पदार्थ पाटीवर लिही.

5NMAYB

# भाजी तयार करणे

- चित्रे पाहा. चित्रांतील कृतींचा क्रम दिलेल्या गोलात लिही.




- खालीलपैकी एक पदार्थ तयार करण्याची कृती सांग.

(अ) भेळ तयार करणे. (इ) चहा तयार करणे.

(आ) पुरी तयार करणे. (ई) सरबत तयार करणे.

* चित्रशब्दकोडे पूर्ण कर.



* शब्दसाखळी तयार कर.

जसे– हिरवा – वाकडा – डावा – वाट – टरबूज

(अ) माकड ..................................

(आ) भाकर ..................................

(इ) पालक ..................................

(ई) सरबत ..................................

# १२. पाऊसफुले

आज शनिवार. सकाळची शाळा. ससोबा लवकर उठला.

शेपटी फुगवून आळस देत ससोबा म्हणाला, “अगं आई, सकाळ झाली. तू कामाला लागलीस. खाऊ आणायला बाबा बागेत गेले, तरी अजून सूर्य कसा नाही उगवला? प्रकाश कसा नाही पडला गं? अं.. अजून रात्र आहे का गं आई?”

आईने ससोबाला जवळ घेतलं. खुदकन हसत ससोबा म्हणाला, ‘‘आई.. तुझ्या मिशा टोचतील हं मला.’’ तुडतुड शेपटी हलवत आई प्रेमाने म्हणाली, ‘‘अरे वेडुल्या, ऐक तर.’’ ससोबा कान ताठ करून ऐकू लागला.

आई सांगू लागली, ‘‘आता आभाळ भरून आलंय. आकाशात काळे ढग आलेत. आता प्रकाश पडेल चमचमणाऱ्या विजेचा. आवाज येईल गडगडणाऱ्या ढगांचा. मग येईल पहिला पाऊस. गारेगार पाऊस. रिमझिम पाऊस. तडतड पाऊस. मुसळधार पाऊस.’’

कोबी आणि गाजरं घेऊन बाबा बागेतून येत होते. ससोबा शेपटी ताठ करून जोरात धावत सुटला. पहिल्या पावसाची रिमझिम बातमी त्याला बाबांना सांगायची होती. इतक्यात चमकन् वीज चमकली आणि झाला की गडगडाट! ससोबा इतका दचकला, की धाडकन् बाबांवरच आपटला. काही बोलणार इतक्यात टपटप टपटप पाऊस वाजू लागला.

ससोबाला इतका आनंद झाला, की त्याला काही बोलताच येईना. त्याने बाबांना घट्ट मिठी मारली.



घरी आई वाटच पाहत होती. घरी येताच ससोबा आईला ढकलतच अंगणात घेऊन गेला. आई, ससोबा आणि बाबा सारे मिळून पावसात गारेगार भिजले. पावसात नाचले. गाणी गायले.

पाऊसफुलांत भिजताना आपल्या ओल्या मिशांवर हात फिरवत ससोबा आईला म्हणाला, ''आई-आई पावसात असं भिजल्यावर आल्याचा गरम गरम चहा बरा, म्हणून मी तुला भिजायला आणलं गं...''

चिंब भिजलेल्या ससुल्याला जवळ घेत आई म्हणाली, ''आलं माझ्या लक्षात!''

**– राजीव तांबे**

## वर्गकार्य

- **पाठ अगोदर मनातल्या मनात वाच. नंतर मोठ्याने वाच.**
- **जोड्या जुळवून लिही.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| ससुला | आल्याचा |
| ढग | वेडुला |
| पाऊस | काळे |
| चहा | मुसळधार |

- **कोण ते सांग.**

चमकली ··· टपटप वाजला ··· दचकला ··· कोबी घेऊन आले ··· पावसात नाचले ···

- **ससुल्याने आईला ढकलत अंगणात का नेले असेल ते सांग.**
- **पाहा, वाच आणि असे शब्द लिही.**

| र ची गंमत | | |
|---|---|---|
| | त् + र = त्र | मित्र ........................................ |
| | प् + र = प्र | प्रकाश ........................................ |
| | ट् + र = ट्र | ट्रक ........................................ |
| | श् + र = श्र | श्रावण ........................................ |
| | र् + य = ऱ्य | चमचमणाऱ्या ........................................ |
| | र् + य = र्य | सूर्य ........................................ |

- **'' '' हे चिन्ह असलेली पाठातील वाक्ये वाच.**
- **वाच आणि लक्षात ठेव.**

एखाद्या व्यक्तीने बोललेली वाक्ये '' '' या चिन्हाचा उपयोग करून लिहितात. या चिन्हाला **दुहेरी अवतरण चिन्ह** म्हणतात.

HK95N7

# १३. एक तांबडा भोपळा

- **ऐकूया. गाऊया.**

एक तांबडा भोपळा
विळीवर कापला
त्याच्या उभ्या फोडीमध्ये
अर्धचंद्र लपला





एक तांबडा भोपळा
उन्हात वाळवला
पाठीवरती बांधून
बाळ्या पोहू लागला




एक तांबडा भोपळा
तंबोऱ्याला लावला
कुणी तारा छेडताच
साथ करू लागला



एक तांबडा भोपळा
पाय लावले त्याला
गेला टुणुक टुणुक
घेऊन म्हातारीला

एक तांबडा भोपळा
कुठं होता पळाला ?
गणिताच्या पुस्तकात
जागोजागी मिळाला.




**– पद्मिनी बिनीवाले**

## वर्गकार्य

- **कविता चालीवर म्हण.**
- **केव्हा घडले ते सांग.**

(अ) फोडीमध्ये अर्धचंद्र लपला.

(आ) कुणी तारा छेडताच साथ करू लागला.

(इ) गेला टुणुक टुणुक घेऊन म्हातारीला.

- **काय ते सांग.**

(अ) कापण्यासाठी वापरतात.

(आ) उन्हात वाळवितात.

(इ) गणिताच्या पुस्तकातील भोपळा.

**उपक्रम :**

'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक' ही गोष्ट मिळव, वाच व वर्गात सांग.

## वाचूया, लिहूया

- **शब्द वाच व पाटीवर लिही**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ख्य | संख्या | मुख्य | सख्य | नवख्या |
| क्य | वाक्य | अशक्य | इतक्यात | बोक्याला |
| द्द | मुद्दा | मुद्दल | हद्द | बद्दल |

### सारे हसूया.



**मुलगा :** आई, बागेत झाडांना पाणी घालू का?
**आई :** नको बाळा, बाहेर पाऊस पडतोय.
**मुलगा :** बरं मग, रेनकोट घालून पाणी घालतो.

UGUZD3

# वाचूया, लिहूया

- चित्र पाहूया, शब्द वाचूया, लिहूया.



म्हैस

............



ट्रक

............



पुस्तक

............



कुत्रा

............



चंद्र

............



चष्मा

............



छत्री

............



बॅट

............



वर्तमानपत्र

............



कैऱ्या

............



कुऱ्हाड

............



बिस्किट

............



घड्याळ

............



खुर्ची

............



आइस्क्रीम

............



किल्ला

............

# १४. झरीपाडा

पहाटे पहाटे कोंबडा आरवतो. झरीपाडा जागा होतो. हिरव्यागार डोंगराआडून सूर्य उगवतो. सूर्योदयाबरोबर डोंगर तांबूस किरणात न्हाऊन निघतो. सकाळ होताच सर्वजण आपापल्या कामाला लागतात. लोक विहिरीवरून पाणी भरतात. शेतकरी गाडीला बैल जुंपून शेतावर निघतात.बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा मंजूळ आवाज सर्वत्र ऐकू जातो. मुले-मुली आंबील पिऊन सायकलवरून शाळेला जातात.

पाड्याजवळून झरा वाहतो म्हणून त्याचे नाव झरीपाडा पडले आहे. झरा डोंगरात उगम पावतो. तो मोठ्या ओढ्याला मिळतो. मोठा ओढा गावाजवळच्या नदीला जाऊन मिळतो. डोंगर उतारावर खाचरात भातशेती होते. तसेच नाचणीचे पीक घेतले जाते.

पाड्यावरील घरे छोटी छोटी आहेत. घराचे छप्पर गवताच्या पेंढ्यांनी किंवा झावळ्यांनी शाकारतात. घरातील जमीन, अंगण शेणाने सारवतात. भिंतीवर सुंदर सुंदर चित्रे काढलेली असतात. ती वारली चित्रकलेतील असतात. घरे आतबाहेर स्वच्छ असतात. घरातील भांडीकुंडी स्वच्छ असतात. परिसरात कोठेही कचरा नसतो. घराच्या बाजूला जनावरांसाठी गोठा असतो. कोंबड्यासाठी खुराडे असते. घरोघरी कुत्रा पाळला जातो.



घराच्या अवतीभोवती खजुरी, साग, कडुलिंब, आंबा, बोर, चिंच यांसारखी झाडे असतात. लोक आनंदाने फळे खातात. त्यांच्या जेवणात नाचणीची भाकरी, सुकी मासळी आणि पेज असते. अवतीभोवतीच्या परिसरातील करटोली, शेवळी, ससेकान यांसारख्या रानभाज्या ते आवडीने खातात. कंद उकडून खातात.

घरातील भिंतीला तारपा वाद्य टांगलेले असते. रात्रीच्या चांदण्यात तारपा वाजू लागला, की मुले-मुली नाच करतात. नृत्य पाहण्यासाठी वाडगो आणि वाडगिणी हजर असतात.घरातील मोठ्या पुरुषाला वाडगो तर महिलेला वाडगीण म्हणतात. पाड्यावरील सर्वजण त्यांची आज्ञा पाळतात.



## वर्गकार्य

- पाठ मोठ्याने वाच.
- पाठ वाच आणि लिही.

(अ) पाड्याचे नाव ........................

(आ) चित्रकलेचे नाव ......................

(इ) वाद्याचे नाव ........................

(ई) घरातील मोठा पुरुष .................

(उ) घरातील मोठी महिला ..............

**प्रकल्प :**

- पुढील मुद्द्यांना अनुसरून तुझ्या घराची व परिसराची माहिती मिळव आणि वर्गात सांग.

(अ) घराच्या परिसरातील झाडे व त्या झाडांचे उपयोग

(आ) माहीत असलेल्या वाद्यांची नावे

(इ) अन्नपदार्थ

(ई) घर तयार करण्यासाठी वापरलेले साहित्य

(उ) घरातील नातेसंबंध व त्यांची नावे

(ऊ) घरातील लोक करत असलेली कामे

- , हे चिन्ह असलेले पाठातील वाक्य वाच.
- वाच आणि लक्षात ठेव.

एखाद्या वाक्यात एकापेक्षा अधिक नावे आल्यास त्यांचा वेगळेपणा कळण्यासाठी नावानंतर , हे चिन्ह वापरतात. या चिन्हाला **स्वल्पविराम** म्हणतात.

7DGU2Y

## नावांचा लपंडाव

- **पुढे दिलेली वाक्ये वाच. त्यात पक्षी, फळ, वाद्य, शरीराचे अवयव यांची नावे लपलेली आहेत. कंसातील शब्द वाचून ती शोध. कोणत्या वाक्यात कशाचे नाव लपले आहे ते लिही.**

(१) धान्य **पेरू**न शेतकरी घरी परत आला– (फळ) जसे–पेरू

(२) कामाची टाळाटाळ करू नये. (वाद्य)........................

(३) दारासमोर गाय उभी होती. (पक्षी)........................

(४) हातच्या काकणाला आरसा कशाला (शरीर अवयव) ........................

### वाचूया, लिहूया

- **पाहा,वाच आणि लिही.**

| | | |
|---|---|---|
| त्याला ............. | सुद्धा ............. | सत्ता ............. |
| नृत्य ............. | म्हणाली............. | दिनदर्शिका............. |
| अभ्यास ............. | वर्ष............. | रात्र ............. |
| प्रवास ............. | खात्री ............. | दप्तर ............. |
| स्वत: ............. | विस्कटणे............. | गोष्ट............. |

- **वरील प्रत्येक शब्द वापरून एकेक वाक्य सांग.**

- **हे शब्द असेच लिही, वाच.**

| | | | |
|---|---|---|---|
| ही ............. | लिंब ............. | टिंब ............. | भिंत ............. |
| आणि ............. | पाणी ............. | मित्र ............. | विहीर ............. |
| माहीत ............. | माहिती ............. | मंदिर ............. | उंदीर ............. |
| गरीब ............. | गरिबी ............. | विनंती............. | बारीक ............. |
| किती ............. | चिमणी ............. | कणीक ............. | महिला ............. |
| भूक ............. | पूर ............. | पाखरू ............. | अंकुर ............. |
| हुतूतू ............. | कुलूप ............. | हळूहळू ............. | मुळूमुळू ............. |

# नाव आणि नावाऐवजी येणारे शब्द

- **वाक्ये वाच. तक्त्यात उत्तरे लिही.**

(अ) आज समीरचा वाढदिवस आहे. त्याने मित्रांना मिठाई दिली.
(आ) सुजाता म्हणाली, ‘‘मी आज खेळायला येणार नाही.’’
(इ) ओंकार, राजू तुझा भाऊ आहे. त्याला त्रास देऊ नकोस.
(ई) शबाना फातिमाला म्हणाली, ‘‘तू आणि मी बागेत जाऊ.’’

| नाव | नावाऐवजी आलेला शब्द |
|---|---|
| समीर | |
| सुजाता | |
| ओंकार | |
| राजू | |
| शबाना | |
| फातिमा | |

- **पत्र वाचूया. नावाऐवजी आलेले शब्द ओळखूया.**

प्रिय गौरी,

**तू** कशी आहेस...?. **मी** दुसरीत शिकत आहे. **माझी** शाळा खूप छान आहे. **तुम्ही** सर्व एकदा **माझ्या** शाळेत या. **आम्ही सर्व तुमच्याकडे** येणार आहोत. **तू** आणलेली भेळ, सफरचंद खूप छान होते. **मला तुझी** खूप आठवण येते.

**तुझी** मैत्रीण,
मयुरी

- **पत्रात गौरीऐवजी कोणते शब्द आले आहेत ते पाटीवर लिही.**
- **पत्रात मयुरीसाठी कोणते शब्द आले आहेत ते पाटीवर लिही.**



**सारे हसूया.**



**माधवी :** वाघाच्या गुहेत शिरलेला माणूस जिवंतपणे बाहेर पडू शकेल का?
**गौरी :** नक्कीच! पण त्या गुहेत वाघ नसला पाहिजे.

## परिसर समजून घेऊया

- थोडा विचार करूया आणि उत्तर लिहूया.

| अवयवाचे चित्र | अवयवाचे नाव | हा अवयव कोणाचा ? | याच्या घराचे नाव | याचे अन्न |
|---|---|---|---|---|
|  | .............................. | .............................. | .............................. | .............................. |
|  | .............................. | .............................. | .............................. | .............................. |
|  | .............................. | .............................. | .............................. | .............................. |
|  | .............................. | .............................. | .............................. | .............................. |

## शब्दडोंगर

- वाच. लिही.



आंबा

हा आंबा

हा आंबा आहे.

हा आंबा मोठा आहे.

हा आंबा मोठा, पिवळसर आहे.

हा आंबा मोठा, पिवळसर व रसाळ आहे.

हा आंबा मोठा, पिवळसर, रसाळ व गोड आहे.

- खालील शब्द घेऊन शब्दडोंगर तयार कर.

(अ) झाड (आ) फूल (इ) गाव (ई) घर

## थोडा विचार करूया

# १५. चित्रवाचन

- चित्रात प्राणी एकमेकांशी काय बोलत असतील ते सांग व लिही.




जंगल

# १६. चुलीवरची खीर

- ऐकूया. गाऊया.



चुलीवरची खीर एकदा पुरीला हसली
कढईतली पुरी मग गुरफटून बसली
काही केल्या खुलेना, जरा सुद्‌धा फुलेना
झाऱ्यानं टोचलं, ते ही तिला बोचलं
अशी थट्टा पुरीच्या काळजाला डसली



पुरी झाली लाल, तिचे फुगले गाल
मन आले भरू, डोळे लागले झरू
तिथून उठून तरातरा ताटात जाऊन बसली



खीर थंड झाली वाटीत बसून आली
लाडे लाडे खीर मग पुरीजवळ गेली
''पुरीताई पुरीताई बघ जरा इकडे
माझे म्हणणे ऐक गडे''... पण अं हं...
चार शब्द ऐकेल तर पुरी ती कसली



तिकडून ताई आली,तिने युक्ती केली
खिरीची नि पुरीची खूप गट्टी झाली
तेव्हापासून त्यांची जोडी पक्की होऊन बसली
कढईतील पुरी मग कध्धी नाही रुसली

– निर्मला देशपांडे



## वर्गकार्य

- **कोण ते लिही.**

(अ) पुरीला हसणारी ..........................

(आ) ताटात जाऊन बसणारी ..........................

- **खिरीची आणि पुरीची गट्टी होण्यासाठी ताईने कोणती युक्ती केली असेल ते सांग.**
- **जेवणात खीर, पुरी यांची जोडी असते. तशी तुझ्या जेवणात कोणत्या पदार्थांची जोडी असते ते सांग.**
- **शेवटच्या अक्षरांचा उच्चार सारखा असणाऱ्या कवितेतील शब्दांच्या जोड्या शोधून पाटीवर लिही.**
- **पुढील शब्दांच्या जोड्या वापरून एकेक वाक्य सांग.**

पातेले-खीर     कढई- पुरी     झारा-पुरी

ताट-जेवण     वाटी-वरण, आमटी

- **तुझ्या बाबतीत हे केव्हा घडले ते सांग.**

गट्टी होणे, जोडी पक्की होणे, रुसून बसणे, आनंद होणे, वाईट वाटणे

**सारे हसूया.**



**अमेय :** अगदी थोड्यावेळापूर्वीच माझा कुत्रा हरवलाय.

**श्रुती :** अरे, मग पेपरात (वर्तमानपत्रात) जाहिरात देऊया का?

**अमेय :** अरे, पण काय उपयोग? माझ्या कुत्र्याला कुठे वाचता येते.

- **वाच. शिक्षकांकडून समजून घे.**

कोणत्याही कामाची ही तीन आवश्यक अंगे आहेत. काम जाणून केले पाहिजे, नेटके केले पाहिजे, वेगाने केले पाहिजे. हे तिन्ही गुण साधले म्हणजे काम साधले.

**– विनोबा भावे**



**काम व्यवस्थित होण्यासाठी तू काय काय करशील?**

JA3NRU

# १७. दिनदर्शिका




**दिनू :** मित्रांनो ! ऑगस्ट महिन्यात आपला स्वातंत्र्य दिन साजरा झाला. शाळेत झेंडावंदन झाले, प्रभातफेरी निघाली, भाषणे झाली, मुलांना खाऊ दिला. आता २६ जानेवारीला आपल्या शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा होईल.

**रहीम :** दिनू , तुला कसे रे कळते, कोणत्या दिवशी काय साजरे होणार आहे ? कोणत्या दिवशी सुट्टी आहे ?

**दिनू :** त्यात काय एवढे ! अरे, घरी दिनदर्शिका असते ना. त्यात सर्व माहिती दिलेली असते.

**मुमताज :** काय काय माहिती असते दिनदर्शिकेत ?

**दिनू :** दिनदर्शिकेत वर्ष, महिने, वार आणि दिनांक दिलेले असतात.

**रंजना :** आणखी काय बरे असते ?

**दिनू :** विविध सण, उत्सव दिलेले असतात. थोर व्यक्तींची जयंती, पुण्यतिथी असे दिनविशेष दिलेले असतात.

**हेमांगी :** दिनू, तुला तर फारच माहिती आहे रे!

**दिनू :** हो, मी रोज सकाळी दिनदर्शिका वाचतो, मगच शाळेत येतो. त्यामुळे परिपाठात मला माहिती सांगता येते.

**अर्चना :** चला मित्रांनो, आपण वर्गातील दिनदर्शिका समजून घेऊया.

## वर्गकार्य

- दिनदर्शिका पाहा, वाच आणि उत्तरे पाटीवर लिही.

(अ) ऑगस्ट महिन्याचे एकूण दिवस

(आ) ऑगस्ट महिन्यात आलेले एकूण रविवार


















(इ) ऑगस्ट महिन्यात पाच वेळा आलेले वार

(ई) ऑगस्ट महिन्यात आलेले सण

(उ) पौर्णिमा असलेला दिनांक व वार

(ऊ) अमावस्या असलेला दिनांक व वार

- इंग्रजी, मराठी महिने शोध व पाटीवर लिही.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जा |  | मा | र्च | श्रा | पौ | ष |  |
| ने | ए | प्रि | ल | व |  |  | नो |
| वा | डि | फे |  | ण |  | ऑ | व्हें |
| री | सें | ब्रु | का | भा | ऑ | क्टो | ब |
|  | ब | वा | र्ति | द्र | ग | ब | र |
| चै | र | री | क | प | स्ट | र |  |
| त्र |  |  |  | द |  |  |  |
|  | जू | वै | शा | ख | आ | श्वि | न |
| ज्ये | न |  | मा | घ | षा |  |  |
| ष्ठ |  | जु | लै |  | ढ |  | मे |
|  | स | प्टें | ब | र |  |  |  |
| मा | र्ग | शी | र्ष |  | फा | ल्गु | न |

- तुला आवडणाऱ्या पक्षी व प्राण्यांच्या चित्रांना गोल कर.
- पुढील महिन्यातील एका आठवड्यात काय काय करशील ते दिनदर्शिका पाहून सांग.

CW9EDK

# १८. हिवाळा



• **ऐकूया. गाऊया.**

डोंगराच्या पलीकडे
शेकोटी जळे
शेकत बसलेत
डोंगर निळे

उंच आभाळात
रंगत जुळे
तळ्यात संथ
धुके विरघळे

झाडावर डुलतात
पिवळी पिवळी फुले
उसाला लागलेत
लांब लांब तुरे

ऊस अन् शेंगा
चिंचा नि बोरे
पेरूही पिकून
झालेत पिवळे!

थंडीचा वारा
पोटभर चारा
उंडारतो चौखूर
गाईचा गोऱ्हा

**– अनंत कांबळे**

## वर्गकार्य


- **कविता वाच. जोड्या जुळवून पाटीवर लिही.**


| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| डोंगराच्या पलीकडे जळणारी शेकोटी | धुके |
| धुक्यामुळे निळसर दिसणारे | पिवळी फुले |
| तळ्यात विरघळणारे | डोंगर |
| झाडावर डुलणारी | पेरू |
| पिकून पिवळे झालेले | उगवता सूर्य |

- **शेवटच्या अक्षरांचा उच्चार सारखा असणाऱ्या कवितेतील शब्दांच्या जोड्या शोधून पाटीवर लिही**

### खेळूया शब्दांशी

- **तुझ्या शिक्षकांच्या मदतीने रिकाम्या जागी योग्य शब्द लिही.**




- **चिकटलेले शब्द सुटे करून पाटीवर लिही.**

मासापालकलाटणेमोरजाईसरबतघेवडापतंगविमानथवाकिलबिल

- **कविता पूर्ण कर.**

आकाश होते निळे निळे  
ढग आले ......................  
वारा सुटला सोंऽ सोंऽ  
पाऊस आला ......................

PSV93G

# १९. संगणकाची करामत



बाई : नमस्कार, बालमित्रांनो.

विद्यार्थी : नमस्कार, बाई.

बाई : मुलांनो, आज तुम्हांला माणसापेक्षा वेगाने काम करणारे यंत्र दाखवणार आहे.

छाया : बापरे! माणसापेक्षा वेगाने..? किती मोठे असेल ते यंत्र! बघायलाच हवे.

मंगेश : खरंच, असेल का असे यंत्र पल्लवी?

बाई : मंगेश काय रे, काय झाले? असा शंकेखोर नजरेने का पाहतोस?

पल्लवी : बाई, त्याला वाटते, असे काही नसेलच.

बाई : चला तर माझ्यासोबत. मी तुम्हांला दाखवते. हे बघा. याला संगणक म्हणतात.
(सर्वच मुले आश्चर्यचकित नजरेने पाहतात.)

समीर : बाई ही वायर कसली हो आणि वायरला उंदरासारखे काय जोडले आहे?

बाई : अरे याला माऊस म्हणतात. इंग्रजीत उंदराला माऊस म्हणतात ना!

**सुनिता** : बाई हे इतके छोटे यंत्र कोणकोणती कामे करते ते सांगा ना.

**बाई** : हे बघा मुलांनो, संगणक छोटा आहे; परंतु तो खूप कामे करतो बरं. संगणकावर टाईप करता येते. गाणी, गोष्टी ऐकता येतात. चित्रपट पाहता येतात. संदेश, चित्रे, पत्रे, पुस्तके यांसारखी माहिती जगात कोठेही वेगाने पाठवता येते. चित्रे काढता येतात. खूप माहिती साठवून ठेवता येते.

**अक्षय** : बाई, पुस्तकातील पाठ, चित्रे संगणकावर पाहता येतील का? कविता ऐकता येतील का?

**बाई** : हो.

**साहिल** : बाई, आम्हांला ऐकवा ना मग!

**बाई** : चला आपण ऐकूया.

(हळूच या हो हळूच या! ही कविता ऐकवतात आणि मुलाफुलांचा संवाद दाखवतात. मुले आश्चर्यचकित नजरेने पाहतात.)

**साहिल** : बाई, खरंच किती छान! हा संगणक कसा लिहितो?

**बाई** : मी दाखवते तुम्हांला. (बाई कीबोर्डवर टाईप करतात आणि अक्षरे दिसू लागतात.)

**अर्चना** : बाई, संगणक कोणकोणती कामे करतो हे समजले. फारच करामती आहे हा संगणक! आता आम्ही संगणकाविषयी अधिक माहिती मिळवू. तुम्ही कराल ना मदत?

**बाई** : हो. पुढील वेळी आपण अधिक माहिती मिळवू.

## वर्गकार्य

- **कोणते लिही.**

(अ) टाईप करतो ...............    (आ) गाणे ऐकवतो ...............

(इ) चित्रपट दाखवतो ...............    (ई) संदेश पाठवतो ...............

(उ) करामती आहे ...............    (ऊ) वेगाने काम करणारे यंत्र ...............

- **संगणकाचे चित्र काढ व रंगव.**

**उपक्रम :**

संगणकाची अधिक माहिती मिळव. मित्रांना सांग.

2PH3SC

# कृती ओळखूया, लिहूया

- चित्रातील कृती बघून तो मुलगा काय करतो/ती मुलगी काय करते ते लिही.



तो **धावतो**



.......................



.......................



ती **धावते**



.......................



.......................

- खालील रिकाम्या जागेत योग्य शब्द लिही.

(अ) मी सकाळी लवकर..................

(आ) मंगल शाळेत..................

(इ) वैशाली चेंडू..................

(ई) आजी कोंथिंबीर ..................

- कंसातील योग्य शब्द निवड व वाक्य पूर्ण कर.

(काढला, आहे, खाल्ला, विकली, घेतला, गेले)




आज गुरुवार. गावचा बाजार ........ . आई-बाबा भाजी घेऊन बाजारला ........ . बाजारात जाऊन भाजी ........ . मुलांसाठी त्यांनी खाऊ विकत ........ . घरी येताच पिशवीतील खाऊ........ . सर्वांनी आनंदाने खाऊ ........ .

- हे शब्द असेच पाटीवर लिही. (ऊ की वू)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वू | जेवून | धावून | लावून | रोवून | ठेवून | सारवून |
| ऊ | खाऊन | देऊन | घेऊन | येऊन | जाऊन | धुऊन |

# एक–अनेक ओळखूया

- चित्र पाहा व लिही.

| एक | | अनेक | |
|---|---|---|---|
|  | पुस्तक |  | पुस्तके |
|  | ...................... |  | ...................... |
|  | ...................... |  | ...................... |
|  | ...................... |  | ...................... |
|  | ...................... |  | ...................... |
|  | ...................... |  | ...................... |
|  | ...................... |  | ...................... |

- **वाच आणि समजून घे.**

| एक | अनेक |
|---|---|
| छत्री | छत्र्या |
| पान | पाने |
| घड्याळ | घड्याळे |
| वही | वह्या |
| मूल | मुले |

| एक | अनेक |
|---|---|
| पोपट | पोपट |
| सिंह | सिंह |
| पतंग | पतंग |
| कान | कान |
| पेरू | पेरू |

## वाचूया, लिहूया

- **शब्द वाच आणि लिही.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्र | चक्र | क्रिकेट | क्रमांक | विक्रम |
| श्र | श्रम | श्रावण | श्रीमंती | श्रीधर |
| र्थ | अर्थ | विद्यार्थी | प्रार्थना | तीर्थरूप |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| म्ह | आम्ही | म्हैस | म्हणाला | तुम्हाला |
| त्स | वत्सला | उत्सव | उत्साह | संवत्सर |
| स्व | स्वर | स्वाती | स्वागत | स्वामी |
| न्ह | चिन्ह | उन्हाळा | तान्हा | कान्हा |
| श्च | पश्चिम | आश्चर्य | निश्चित | निश्चय |
| ष्ठ | ज्येष्ठ | निष्ठा | पृष्ठ | श्रेष्ठ |
| च्च | सच्चा | कच्चा | गच्ची | उच्चार |

# जाहिरात वाचन

या.... या..पक्ष्यांचे नाटुकले पाहा...    बालकांच्या आग्रहास्तव..

तिकीट– बालकांना ५ रुपये,
मोठ्यांना २५ रुपये

*फक्त एकच दिवस*



## किलबिल

**लेखक–** सागर मासे

**दिग्दर्शक–** माकडोजी उडीमारे

**कलाकार–** पोपट हिरवे, कावळोजी काळे, बगळेजी पांढरे, कोंबडोजी तुरे, कोकीळ गायके आणि चिऊताई चिमणे

**टीप–** पहिली, दुसरीतील मुलांना मोफत प्रवेश. त्यांना बिस्कीट पुडा मिळेल.

**ठिकाण–** सिंहजी नाट्यगृह, ससोबा रोड, लांडगेनगर, वनपूर

**दिनांक –** २६ जानेवारी    **वेळ–** सायंकाळी ५ ते ७ वाजता

- जाहिरात वाच आणि उत्तर लिही.

(अ) बालकांसाठी तिकिटाचा दर ..........................

(आ) मोफत प्रवेश कोणाला? ..........................

(इ) पक्ष्यांच्या नाटुकल्याचे ठिकाण ..........................

(ई) आईबाबांसाठीचे तिकीट दर ..........................

(उ) पक्ष्यांच्या नाटुकल्यातील कलाकार ..........................


**उपक्रम :**


शिक्षकांच्या मदतीने पुस्तकातील 'पाऊसफुले' या पाठावर नाटुकले बसवा आणि सादर करा.

# २०. कणभर तीळ

- ऐकूया, गाऊया.

वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा
उडत चालले टणाटणा!
वाटेत भेटला तिळाचा कण
हसायला लागले तिघेही जण!





तीळ चालला भरभर
थांबत नाही कुठे पळभर!
''तिळा, तिळा, कसली रे गडबड?''
''थांबायला वेळ नाही.
सांगायला वेळ नाही.
काम आहे मोठं, मला नाही सवड!''
''ऐक तर जरा, पहा तर खरा,
कणभर तिळाचा मणभर नखरा!''
''बघा तरी थाट! सोडा माझी वाट!''
''बघूया गंमत, करूया जंमत!
चला रे जाऊ याच्याबरोबर.''

तीळ चालला भराभर. वाटेत लागले ताईचे घर.
तीळ शिरला आत, थेट सैपाकघरात.
ताईच्या हातात छोटीशी परात
हलवा करायला तीळ नाही घरात!
ताई बसली रुसून, तीळ म्हणतो हसून,
''घाल मला पाकात, हलवा कर झोकात.''
ताईने टाकला तीळ परातीत.
चमच्याने थेंब थेंब पाक ओतीत,
इकडून तिकडे बसली हालवीत.
शेगडी पेटली रसरसून,
वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा गेले घाबरून!





– लीलावती भागवत

## वर्गकार्य

- कोण ते लिही.

(अ) तिळाला पाहून हसणारे ............................

(आ) तिळाच्या बरोबर जाणारे ............................

(इ) हलवा करणारी ............................

- **का ते लिही.**

(अ) वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा हे तिळाला हसू लागले, कारण ............................
..............................................................................

(आ) वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा हे तिळाबरोबर निघाले, कारण ............................
..............................................................................

(इ) ताई रुसून बसली, कारण ............................
..............................................................................

(ई) वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा घाबरून गेले, कारण ............................
..............................................................................

- **असे कोण म्हणाले ?**

(अ) तिळा,तिळा कसली रे गडबड ............................

(आ) काम आहे मोठं , मला नाही सवड ............................

- **पाठातील गमतीदार वाक्ये शोधून पाटीवर लिही.**

जसे– उडत चालले टणाटणा

- **! हे चिन्ह असलेली पाठातील वाक्ये शोध आणि पाटीवर लिही.**

**वाच आणि लक्षात ठेव.**

आश्चर्य, नवल, मनातील भावना प्रकट करताना ! या चिन्हाचा उपयोग केला जातो. या चिन्हाला **उद्‌गारवाचक चिन्ह** म्हणतात.

## उच्चारांची गंमत

- **आधी सावकाश म्हण. वेग वाढवत म्हण. काय गंमत होते ते सांग.**

(अ) काळे राळे, गोरे राळे, राळ्यात राळे मिसळले.

(आ) कच्चा पापड, पक्का पापड.

(इ) चार कचोऱ्या कच्च्या चंदू, चार कचोऱ्या पक्क्या.
पक्क्या कचोऱ्या कच्च्या चंदू, कच्च्या कचोऱ्या पक्क्या.

EL3XH8

# प्रश्न विचारूया

- नमुना प्रश्न वाच. अधोरेखित शब्द वापरून तुझा प्रश्न लिही.

| नमुना प्रश्न | तुझा प्रश्न |
|---|---|
| • रमेश, तू का आला आहेस ? | • ................................ |
| • सविता, तू केव्हा आली आहेस ? | • ................................ |
| • संदीप, तुला पैसे कशाला हवेत ? | • ................................ |
| • आई, आपण सहलीला कधी जायचे ?' | • ................................ |
| • माझे पुस्तक कुठे आहे ? | • ................................ |
| • फरीदा काय वाचत आहे ? | • ................................ |
| • हे चित्र कसे दिसते ? | • ................................ |
| • या पुस्तकाची किंमत किती आहे ? | • ................................ |

- गटात प्रश्न विचार आणि उत्तरे पाटीवर लिही.

| | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| • जसे-चिंच-आंबट | (१) चिंचेची चव कशी आहे ? | चिंचेची चव आंबट आहे. |
| | (२) आंबट काय आहे ? | चिंच आंबट आहे. |


- सोनाली – हुशार
- दूध – गरम
- बर्फ – थंड
- शर्ट – रंगीत
- लोखंड – जड
- कापूस – हलका
- खुर्ची – लहान
- गूळ – गोड
- मीठ – खारट
- फूल – सुगंधी
- पाणी – स्वच्छ
- आवळा – तुरट

- वरील शब्दांतील विरुद्धार्थी शब्दांच्या दोन जोड्या शोधून पाटीवर लिही.

- हे शब्द असेच पाटीवर लिही. (श की ष)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| श | उशीर | पोशाख | शेतकरी | प्रकाश | शर्यत | विशेष |
| ष | रेषा | विषय | आषाढ | औषध | मनुष्य | |

# २१. आपला भारत



भारत देश! आपल्या सगळ्यांचा देश!

भारतात उंच पर्वत आहेत. घनदाट जंगले आहेत. लहान मोठ्या नद्या आहेत. नद्यांकाठी गावे आहेत. गावात लोक राहतात. भारतातील लोकांचे पोशाख वेगवेगळे असतात. त्यांच्या भाषा वेगवेगळ्या असतात. ते वेगवेगळे सण साजरे करतात.

भारतात वेगवेगळी पिके होतात. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी यांसारखी धान्ये पिकतात. हरभरा, तूर, मूग, वाटाणा यांसारखी कडधान्ये पिकतात. केळी, डाळिंब, संत्री, मोसंबी, सफरचंद अशी फळे पिकतात. लोकांच्या आहारात तेथील धान्ये, कडधान्ये, भाज्या आणि फळे असतात. भारतात अशी विविधता आहे.

आपल्या भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा आहे. 'जनगणमन' हे आपले राष्ट्रगीत आहे.

शेतकरी शेतात कष्ट करतात. कामगार कारखान्यात काम करतात. सैनिक आपले रक्षण करतात. प्रत्येकजण देशाच्या हितासाठी मनापासून प्रयत्न करतो. प्रत्येकाला वाटते भारत माझा देश आहे.

मी भारतीय आहे याचा मला अभिमान आहे.



## वर्गकार्य

- पाठ अगोदर मनातल्या मनात वाच, नंतर वर्गात मोठ्याने वाचून दाखव.
- पाठ वाच आणि उत्तरे लिही.

(अ) भारतातील धान्ये –.......................
(आ) भारतातील कडधान्ये –..................
(इ) भारतातील फळे –.......................
(ई) आपला राष्ट्रध्वज –...............
(उ) आपले राष्ट्रगीत –...............

- कोण काय करते ?

(अ) शेतकरी –..........................
(आ) सैनिक –..........................
(इ) कामगार –..........................

**उपक्रम :**

- माहिती मिळव. वर्गात सांग.

(१) तुझ्या परिसरातील धान्ये, कडधान्ये, फळभाज्या यांची यादी कर.
(२) तुझ्या परिसरातील नदी, पर्वत, डोंगर यांची नावे मिळव.
(३) परिसरातील प्राणी, पक्षी यांची नावे मिळव, चित्र काढ व रंगव.

## वाचूया, लिहूया

- शब्द वाच आणि लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| अन्न ............. | गप्पा ............. | रक्कम ............. | उत्तर ............. |
| कल्याण ............. | सत्य ............. | त्याला ............. | सत्कार ............. |
| प्रकार ............. | प्रतीक्षा ............. | प्रत्येक ............. | प्रतिज्ञा ............. |
| वर्ग ............. | गर्व ............. | सर्वत्र ............. | पर्वत ............. |
| राष्ट्र ............. | महाराष्ट्र............. | गुऱ्हाळ ............. | कैऱ्या............. |

**सारे हसूया.**



मनोज कडक उन्हात उभा आहे ते बघून आई ओरडली,
''मनूऽऽ, अरे उन्हात काय करतोयस ?''
**मनोज :** आई खूप घाम आलाय. तो वाळवतोय.


RHPS74


भाग – ४

## कल्पक होऊया

# २२. चित्रवाचन

- चित्रे बघ. चित्रांत काय काय दिसते ते सांग व लिही.






**उपक्रम :** सूर्योदयाच्या वेळी आणि चांदण्या रात्री आकाशाचे व परिसराचे निरीक्षण कर. काय काय पाहिले ते सांग.


# २३. मंगळावरची शाळा

• ऐकूया. गाऊया.



मंगळावरची मुले
पृथ्वीवर आली
शाळेतल्या गंमती
सांगू लागली

मंगळावरच्या शाळेत
पाटी-पेन्सिल नसते
पुस्तकाचेही ओझे
खांद्यावर नसते



संगणक पेटीच
वर्गात असते,
शिक्षकांच्या हातात
पुस्तक नसते

मुलांपाशी असते
संगणक डबी,
तिच्यात असते
सगळी खुबी

इतक्यात तबकडी
चमकू लागली
मुलांना घेऊन
भुर्रकन गेली!

– फादर फिलीप काव्हॉलो



## वर्गकार्य

- **एका वाक्यात उत्तरे लिही.**

(अ) पृथ्वीवर कोण आले ?

..........................................................................................

(आ) मंगळावरच्या शाळेत काय नसते ?

..........................................................................................

(इ) मंगळावरील शाळेच्या शिक्षकांच्या हातात काय नसते ?

..........................................................................................

(ई) मुलांना घेऊन तबकडी कोठे गेली असेल ?

..........................................................................................

(उ) तुझ्या शाळेतील कोणती गंमत तू मंगळावरील मुलांना सांगशील ?

..........................................................................................

- **कोठे असते ते लिही.**

(अ) संगणक पेटी –..........................

(आ) संगणक डबी –..........................

- **काय ते लिही.**

(अ) सगळी खुबी असलेली –..........................

(आ) चमकणारी –..........................

(इ) भुर्रकन गेली –..........................

**उपक्रम :** तुझ्या शाळेची माहिती जमव, वर्गात सांग.

### खेळूया शब्दांशी

- **अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार कर.**

(अ) ल र घ कु ..........................

(आ) जी ला पा भा ..........................

(इ) र ऐ दा ट ..........................

(ई) ग ह द अ म न र ..........................

(उ) र ती बा भा ल ..........................

4EBLVZ

# २४. फुलांचे संमेलन



एका सुंदर बागेत सकाळीच फुलांचे संमेलन भरले होते. जाई, जुई, कर्दळीची सगळीकडे वर्दळ होती. झेंडू, कण्हेरी आणि जास्वंदी दिसत होते आनंदी! पिवळा आणि हिरवा चाफा शांत बसले होते. पांढरा मोगरा स्वच्छ सदरा घालून इकडून तिकडे फिरत होता. सगळ्यांच्या स्वागतासाठी तळ्यातले कमळ डोलत होते. निशिगंधाच्या वासाने वातावरण प्रसन्न झाले होते. सगळ्या बागेत फुलांच्या सुगंधाने फुलपाखरांना आमंत्रित केले होते.

एवढ्यात एका फुलपाखराने संदेश आणला, ''चला, चला फुलांचा राजा आला. चला स्वागताला.'' सगळी फुले सावध झाली. आपापल्या जागेवर ताठ उभी राहिली. मग गुलाबाच्या लाल, टपोऱ्या सुंदर फुलाचे ऐटीत आगमन झाले. बागेतल्या उंच कट्ट्यावर गुलाबराजे बसले. सगळीकडे शांतता पसरली. सदाफुलीने छान गाणे म्हटले. झेंडूने गोष्ट सांगितली. फुलपाखरांनी नाच करून दाखवला.

निशिगंधाने गुलाबरावांचे स्वागत केले. जाई-जुई बाजूला उभ्या राहिल्या आणि गुलाबराजे उभे राहिले. मोठ्या उत्साहाने त्यांनी आपले भाषण सुरू केले. ''माझ्या

सुगंधी मित्रांनो आणि मैत्रिणींनो, या संमेलनात आपण माझे स्वागत केले. माझे मन हरखून गेले. मी आज खूप आनंदी आहे. आजपर्यंत सगळ्यांच्या स्वागताला मीच पुढे असायचो; पण आज माझे स्वागत! मन अगदी प्रसन्न झाले. मित्रांनो, आपला सुगंध असाच सर्वत्र दरवळत राहो. प्रत्येकाच्या जीवनात आनंद फुलावा असे मला मनापासून वाटते. धन्यवाद!''

सगळ्या फुलांनी पाकळ्या हलवल्या. जणू काही त्यांनी टाळ्याच वाजवल्या आणि तिथेच फुलांच्या संमेलनाची सांगता झाली.

अनन्याला अचानक जाग आली आणि पाहते तो काय? तिच्या वाढदिवसाला सगळ्या मैत्रिणी हातात वेगवेगळी फुले घेऊन आल्या होत्या.

**– बाळकृष्ण मुरलीधर बाचल**

## वर्गकार्य

- **पाठ मोठ्याने वाच.**
- **समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळव.**

जसे– सुमन → फूल

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुमन | संदेश | बाग | साफ | आकाश | जंगल |
| निरोप | फूल | उद्यान | आभाळ | स्वच्छ | अरण्य |

- **मी आहे कोण?**

(अ) टपोरे रूप ऐटबाज चाल
लाल रंग माझा
मी आहे फुलांचा राजा
मी कोण? ..............

(आ) बोलत नाही कोणाशी
पिवळा रंग अंगाशी
मी कोण? ..............

(इ) रंग माझा पांढरा
आणि वासही चांगला
मी कोण? ..............

(ई) आहे आमची जोडगोळी
नावे सारखी थोडी थोडी
जोडीने घेतात आमचे नाव
आम्ही कोण? ..............

- **फुलांची नावे शोध व पाटीवर लिही.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| गु | फा | स | नि | जा | ई | स |
| चा | ला | क | शि | जु | मो | दा |
| झें | व्हे | ब | गं | र | ग | फु |
| री | डू | ल | ध | द | रा | ली |

GAXGKV

# २५. फुग्या रे

- ऐकूया. गाऊया.



फुग्या फुग्या
फुगशील किती ?
आभाळी उंच
जाशील किती ?
पक्ष्यांशी गोष्टी
करशील किती ?
वाऱ्याशी झुंज
घेशील किती ?

ढगांना पार
करणार का ?
ताऱ्यांशी खोखो
खेळणार का ?
गेलास जर का
उंचच फार
चंद्राच्या घरी
मुक्काम मार
जोडून दे
टेलिफोनची तार

रोजच रात्री
गप्पांचा वार
मी म्हणेन,
'हॅलॉव हॅलॉव'
तिथून उत्तर,
'काय हो राव ?'
खरंच ना पण
तू वर जाणार ?
की मधल्यामध्ये
'फट्' म्हणणार ?

– वसुधा पाटील



## वर्गकार्य

- **कोण ते लिही.**

(अ) आभाळी उंच जाणारा. –………………

(आ) पक्ष्यांशी गोष्टी करणारा. –………………

(इ) वाऱ्याशी झुंज घेणारा. –………………

(ई) ताऱ्यांशी खो खो खेळणारा. –………………

- **सांग आणि पाटीवर लिही.**

(अ) फुग्यांचा वापर कोठे कोठे होतो ?

(आ) तू पाहिलेल्या फुग्यांचे रंग.

- **कविता वाच आणि सूचनेनुसार पाटीवर लिही.**

(अ) कवितेतील प्रश्नचिन्ह असलेल्या ओळी वाच आणि लिही.

(आ) कवितेतील जोडाक्षर असलेले शब्द वाच आणि लिही .

- **ढग, फुगा, चंद्र, तारे, घर, पक्षी यांची चित्रे काढ आणि रंग भर.**

- **तुला कोठे कोठे जायला आवडेल ते सांग.**

### खेळूया शब्दांशी

- **खाली दिलेले शब्द उलट क्रमाने लिही.** जसे– लता–ताल

| | | | |
|---|---|---|---|
| जीभ …………… | डफ …………… | खरा …………… | ढाल …………… |
| साठ …………… | काम …………… | सर …………… | चावा …………… |
| तवा …………… | सरस …………… | लपा …………… | पटपट …………… |
| वार …………… | सहा …………… | कडक …………… | नऊ …………… |

- **वरील शब्दांपैकी कोणते शब्द उलट क्रमाने लिहिले तरी तसेच राहतात ते लिही व असे आणखी पाच शब्द सांग, लिही.**

**सारे हसूया.**



**ज्युली :** माणसांपेक्षा प्राण्यांचे डोळे चांगले असतात.
**तेजस :** हो का ? कशावरून ?
**ज्युली :** मी कुठल्याही प्राण्याला चष्मा लावलेला बघितलेला नाही.

9X477L

• **मोठ्याने वाचूया.**



माझी नात सोनाली. हसऱ्या चेहऱ्याची, सर्वांना आवडणारी. आम्ही सर्वजण तिला लाडाने सोनू म्हणतो.

सोनूला खूप मित्र-मैत्रिणी आहेत. सोनूला लगोऱ्या खेळायला आवडते. मैत्रिणींसोबत ती क्रिकेटसुद्धा खेळते.

शनिवारी सोनू शाळेतून घरी आली. मला म्हणाली, ''आजी गं, मी खेळायला जाते. मैत्रिणी माझ्यासाठी थांबल्या आहेत.'' मी म्हणाले, ''तू लवकर परत ये.'' सोनू म्हणाली, ''हो आजी, मी येते परत लवकर.''

खेळून झाल्यावर सोनू घराकडे परत येत होती. नवीन ट्रॅक्टर घेऊन येताना तिला दादा दिसला. तो दारासमोर थांबला. सोनाली ट्रॅक्टर पाहत उभी राहिली. दादाला प्रश्न विचारू लागली. सायंकाळी सोनालीचे बाबा पाहुण्यांना घेऊन घराकडे आले. थोडावेळ गप्पा झाल्या. सर्वांची जेवणे झाली. सोनालीने अभ्यास केला. गोष्टीचे पुस्तक वाचत झोपी गेली.



• **वाच. पाटीवर लिही.**

| | | | |
|---|---|---|---|
| हसऱ्या | चेहऱ्याची | सर्वांना | मित्र |
| मैत्रिणी | लगोऱ्या | क्रिकेट | माझ्यासाठी |
| थांबल्या | ट्रॅक्टर | पाहुण्यांना | गप्पा |
| अभ्यास | प्रश्न | गोष्टीचे | पुस्तक |
| म्हणाली | झाल्यावर | सर्वांची | सर्वजण |

# २६. मांजरांची दहीहंडी



एक होती आजीबाई. तिची एक नात होती. दोघींनाही मांजरांची खूप खूप आवड होती.

आजीबाईकडे चार मांजरे होती. एकाचे नाव होते बोकोबा. दुसरा होता सोकोबा, तिसरा काळोबा आणि चौथा साळोबा.

एकदा काय झाले! आजीबाई गेली बाजारात. मांजरे होती घरात.

आजीबाईने लोणी उंचावर ठेवले होते. ते मांजरांनी पाहिले होते. त्यांना लोणी मिळवायचे होते. उडी मारली तर आवाज होईल आणि सगळा बेत फुकट जाईल. मग बोकोबाने बोलावले सोकोबाला. सोकोबाने हाक मारली काळोबाला आणि साळोबाला.

आता बोकोबा, सोकोबा, काळोबा व साळोबा सारे जमले. पण लोणी मिळवायचे कसे?

सगळे विचार करू लागले. छोटा साळोबा फार हुशार. तो सांगू लागला, ''बोकोबा, आपण एकावर एक असे उभे राहू.''

झाले! बेत ठरला आणि बोकोबावर सोकोबा, सोकोबावर काळोबा, काळोबावर साळोबा अशी दहीहंडी तयार झाली.

पलीकडे माधुरी झोपली होती. तिला अचानक जाग आली.

तो काय गंमत, समोर मांजरांची दहीहंडी!

तिला खूप मजा वाटली. तिने इकडे तिकडे पाहिले.

तोच आजी दारात दिसली. माधुरी आनंदाने ओरडली. ''आजी, आजी लवकर ये. मांजरांची दहीहंडी पाहून घे.''

मांजरे एकदम घाबरली आणि लोणी टाकून पळाली.

**– सुशीला कशेळकर**

## वर्गकार्य

- **कोण कोणास म्हणाले?**

(अ) ''बोकोबा, आपण एकावर एक असे उभे राहू.''

(आ) ''आजी, आजी लवकर ये, मांजरांची दहीहंडी पाहून घे.''

- **कोण ते लिही.**

मांजरांमध्ये सर्वांत लहान असणारा·················

मांजरांमध्ये सर्वांत हुशार असणारा ·················

आजीबाई आणि नात यांना आवडणारी·················

मांजरांची दहीहंडी पाहणारी·················

घाबरून पळून गेलेली·················

- **का ते सांग.**

(अ) दहीहंडीत साळोबा मांजर सर्वांत वर उभे राहिले.

(आ) दहीहंडीत बोकोबा मांजर सर्वांत खाली उभे राहिले.

- **तर काय झाले असते ते सांग.**

(अ) आजीबाईंनी लोणी उंचावर ठेवताना मांजरांनी पाहिले नसते, तर ················

(आ) आजी थोड्या उशिराने घरी आली असती, तर ················

- **आईने उंचावर ठेवलेला खाऊ मिळवण्यासाठी तू काय काय करशील ते सांग.**
- **'खूप' हा शब्द दोन वेळा वापरून 'खूप खूप' असा शब्द तयार झाला. तसे आणखी कोणकोणते शब्द दोन वेळा वापरता येतील, ते वापरून तुझे शब्द लिही.**
- **अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द तयार कर.**


| जी | आ | = .......... |


| र | मां | ज | = .......... |

| र | शा | हु | = .......... |

| डी | ही | हं | द | = .......... |

- शब्दातील शेवटचे अक्षर घेऊन शब्दांची दहीहंडी तयार कर.








- घर-घरात असे शब्द तयार कर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दार | ______ | रान | ______ | हात | ______ |
| पान | ______ | दुकान | ______ | अंगण | ______ |

## शब्दचक्र

- वाचूया, लिहूया.




- शेजारील शब्दचक्रात बागेशी संबंधित शब्द दिले आहेत. या शब्दांशिवाय तुला माहीत असलेल्या शब्दांची यादी पाटीवर लिही.
- हे शब्द वापरून वाक्ये तयार करून लिही.

जसे- बागेत खूप झाडे आहेत.

LTQ1WH

# २७. चांदोबाच्या देशात

- ऐकूया. गाऊया.

झाडावर चढू,
आकाशात उडू.
ढगांच्या गादीवर,
धपकन पडू.





मऊमऊ ढगांवर,
घडीभर लोळू.
चमचम चांदण्यांशी,
लपाछपी खेळू.

पळणाऱ्या चांदोबाच्या,
मागे मागे धावू.
चांदण्यांच्या पंगतीला,
पोटभर जेवू.

चांदोबाशी गोडीनं,
खूप-खूप बोलू.
घरातल्या गमती,
सांगत चालू.



चालून चालून,
दुखतील पाय.
चांदोबा बोलेल मला,
''दमलास काय?'

''बस माझ्या पाठीवर,
फिरायला जाऊ.
आकाशगंगा जरा,
जवळून पाहू.''



चांदोबाच्या पाठीवर,
पटकन बसू.
आकाशात फिरताना,
ताऱ्यांसारखं हसू.

– एकनाथ आव्हाड

## वर्गकार्य

- कविता चालीवर म्हण.
- आकाशात गेल्यानंतर मूल काय काय करणार आहे ते सांग.
- चांदोबा मुलाशी काय काय बोलणार आहे?
- तक्त्यात सुचवल्याप्रमाणे शब्द लिही.

| कवितेतील शब्द | | माझे शब्द | |
|---|---|---|---|
| मूळ शब्द | तयार झालेले शब्द | मूळ शब्द | तयार होणारा शब्द |
| झाड | जसे– झाडावर | | |
| आकाश | जसे– आकाशात | | |
| ढग | | | |
| घडी | | | |
| चांदोबा | | | |
| पंगत | | | |
| पोट | | | |
| घर | | | |

- शेवटच्या अक्षरांचा उच्चार सारखा असणाऱ्या कवितेतील शब्दांच्या जोड्या शोधून पाटीवर लिही. (जसे – बसू – हसू)
- एकच शब्द दोन वेळा येऊन तयार झालेले कवितेतील शब्द सांग. (जसे – मागे मागे)
- चांदोबाच्या पाठीवर बसून फिरायला मिळाले तर तू काय काय करशील ते सांग.

YQBVLD

# २८. मोरपिसारा



चिचू उंदीर नेहमी आईच्या मागे भुणभुण करत फिरायचा. कधी कधी त्याला पक्ष्यांसारखं उडावंसं वाटायचं, तर कधी त्याला सशासारख्या उड्या माराव्याशा वाटायच्या.

एकदा चिचू म्हणाला, ''आई, काय हा माझा काळा रंग. मी बदकासारखा गोरा गोरा हवा होतो.''

त्या वेळी तिथून एक परी चालली होती. तिनं ते ऐकलं आणि त्याची गंमत पाहण्यासाठी ती एका झाडाच्या मागं लपून बसली.



आई म्हणाली, ''आपल्या जंगलात रामू हत्ती सगळ्यात बुद्धिमान समजला जातो. त्यालाच जाऊन विचार!''


चिचू पळत रामूकडे निघाला. परी त्याच्या मागे होतीच. वाटेत त्याला मोर दिसला. चिचू रामूकडे पोहोचला.

चिचू म्हणाला, ''मला फक्त मोरासारखा पिसारा हवा आहे.''




त्याची इच्छा ऐकून रामू हसू लागला. तेवढ्यात परीनं जादूची कांडी फिरवली. आणि... चिचूच्या शेपटीच्या वर अगदी मोरासारखा, रंगीबेरंगी पिसांचा पिसारा आला. तो होता छोटाच, त्याच्या मापाचा. पण सुंदर!

चिचूनं पिसारा पाहिला आणि एकदम खूश झाला. तो रामूलाही विसरला. आईला पिसारा दाखवण्यासाठी तो पळत पळत घरी निघाला.



तो बिळापाशी आला. पळून पळून त्याला खूप भूक लागली होती. घाईघाईनं तो बिळात शिरू लागला, अन्... त्याच्या पिसाऱ्यामुळे त्याला आत शिरताच येईना. तो अडकला. मोर पिसारा फुलवू शकतो आणि मिटू शकतो. हा तर होता उंदीर! तो पिसारा त्याचा नव्हता. तो मिटेना. चिचू वैतागला. तो उलटा होऊन आत जाऊ लागला, तर बीळ पूर्ण झाकलं गेलं.

आत आई घाबरली. तिनं तोंडानं ढुशी देऊन त्याला बाहेर ढकललं, तर चिचू पडलाच. ती बाहेर आली. आईनं ढकलून पाडलं, म्हणून चिचूला राग आला. तो आईवर चिडला. त्याला पाहून आईला हसूच फुटलं. ती आधी हसली अन् नंतर तिला काळजी वाटली. 'असा उंदीर कधी असतो का!'



''आई, भूक लागली.''

''बरं! चल आत.''

''कसा येऊ? पिसारा अडकतोय. मिटता येत नाही.
पिसारा कसला, पसाराच हा!''

तिनं खाऊ बाहेर आणला. चिचूला भरवला.

''आई, आता झोप आली.'' खाऊन झाल्यावर तो म्हणाला.

''आत कसा येणार? आता बाहेरच झोप बाळा.'' चिचूला बाहेरच झोपावं लागलं.

बिचाऱ्याला अद्दल घडली. सकाळी आई लवकर बाहेर आली. चिचूही जागा झाला.

''आई, मला हा पिसारा नको.''

असं होणार हे परीला माहीतच होतं. ती आधीच येऊन एका झाडामागे लपली होती. चिचू उदास झाला. परीनं पुन्हा एकदा जादूची कांडी फिरवली.

... आणि चिचू पुन्हा पहिल्यासारखा झाला! आईनं त्याला जवळ घेतलं. त्याला खूप बरं वाटलं.

**–ईशान पुणेकर**

## वर्गकार्य

- पाठ अगोदर मनात वाच. नंतर मोठ्याने वाच.
- चिचूला काय काय करावं वाटायचं ते सांग.
- का ते सांग.
  (अ) परी झाडाच्या मागे लपून बसली.
  (आ) चिचू पळत रामूकडे निघाला.
  (इ) चिचूची इच्छा ऐकून रामू हसू लागला.
  (ई) चिचू बिळाच्या बाहेरच झोपला.
- चिचू उंदराने पिसारा मागून चूक केली, असे तुला वाटते काय? कारणासह सांग.
- तुझ्याजवळ नसलेल्या; पण तुला हव्या असलेल्या गोष्टी सांग. त्या मिळाल्या तर काय होईल ते सांग.

### काय बरे म्हणत असतील?



- मुलगी चित्रातील प्रत्येक वस्तूशी काय बरे बोलत असेल ते सांग.

BLXQB9

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता दुसरी (मराठी) ₹ ५१.००

